मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्ष ५८ वे अंक दुसरा

ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २००७

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक नारायण कुळकर्णी-कवठेकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

युगवाणी

मुखपृष्ठ
प्रदीप सं. नेरूरकर

अंक, मुखपृष्ठ मांडणी व छायाचित्र
विवेक रानडे

अक्षरजुळणी व मुद्रण
नारायण ऑफसेट वर्क्स, धंतोली, नागपूर

मूल्य चाळीस रुपये

वार्षिक वर्गणी शंभर रुपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९

संपादकीय पत्रव्यवहार
'किताव', राऊतवाडी, अकोला - ४४४५०५
दूरध्वनी ०७२४-२४५०१८५
भ्रमणध्वनी ९८५०७४२८८१

या अंकात प्रसिद्ध झालेल्या
लेखनातील मतांशी
संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे
पदाधिकारी सहमत असतीलच
असे नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ संपादकीय ॥

प्रयोगशीलता

कलेच्या क्षेत्रात काही प्रवृत्ती लोकप्रिय होतात, काही जाणकारांना भावतात. काहींना विविध पातळ्यांवर मान्यता मिळते. मग या प्रवृत्तींचा पायंडा पडतो. त्यांचे अनुकरण सुरू होते. पुढे अशा कलाकृतींमधून तोचतोचपणा जाणवतो. त्या लाकेशरण होत जातात. काही प्रलोभनांना बळी जातात. अशा वेळी कोणी एक जण किंवा गटाने प्रयोगाचा, नाविन्याचा ध्यास घेऊन वेगळी, विस्मित करणारी, कधी टीकेची धनी होणारी निर्मिती करतात. सगळेच प्रयोग यशस्वी होतात असे नाही. पण यशस्वी प्रयोगाचा पुढे पायंडा पडतो. असफल प्रयोग अस ज्यांच्यावर शिक्का बसतो, ते पुढे कधीतरी, कालांतराने एखाद्या कलावंताला नवनिर्मितीची प्रेरणा देऊ शकतात. त्याचे गणित मांडता येत नाही. मात्र टूम म्हणून किंवा निव्वळ अनुकरणातून साकार होणारे प्रयोग काळाच्या धुंदीत मिसळून जातात. अस्वस्थता, प्रचलित निर्मितीविषयी असमाधान आणि आशयाला अपरिचित रूप देऊ शकणाऱ्या आकारांचा शोध घेण्याची वृत्ती या प्रयोगशीलतेच्या मुळाशी असणाऱ्या केवळ काही बाबी आहेत. जुन्याच सामग्रीला समकालीन रूप किंवा भविष्याचा वेध घेऊन वर्तमानाची घडण, कधी केवळ सौंदर्यनिर्मितीच्या ध्यासातून आकाराच्या मूलार्थाशी संवाद साधण्याचा प्रयत्न (जशी या अंगाच्या मुखपृष्ठावरील आणि आतील अक्षरचित्रे) अशी प्रयोगशीलतेची विविध रूपे आपल्याला दिसतात. कलानिर्मिती प्रवाही आणि नाविन्यपूर्ण असण्यासाठी प्रयोगशीलतेची गरज कलावंतांना जाणवत असावी आणि रसिकांना स्तिमित करण्याबरोबर शहाणीही करीत असावी.

'युगवाणी'चा मागील अंक प्रसिद्ध झाल्यानंतर हा अंक प्रसिद्ध होण्यास अक्षम्य उशीर झाला आहे. वाचक, वर्गणीदार यांची आम्ही मनापासून क्षमा मागतो. पुढील अंक मागील काळाची भरपाई करतील, असेही येथे नमूद करून ठेवतो.

नारायण कुळकर्णी कवठेकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अ । नु । क्र । म

- **लेख :**
  विंदांच्या कवितांचे स्त्रीवादी पुनर्वाचन (कावेरी डोंगरे, गर्भाधान आणि झपताल या कवितांच्या आधारे) / प्रा. प्रकाश महादेव दुकळे / ५
  धुळे परिसरातील दलितांची बोली : अहिराणी बोलीचा ठळक सामाजिक भेद / प्रा. प्रकाश भामरे / १०
  सरोजा : स्मरण-रेखा / सुशील पगारिया / १७
  कुसुमाग्रजांची ''लिलाव'' : एक चिंतन / डॉ. केशव फाले / २९

- **पुस्तक परीक्षणे :**
  'पाणियावरी मकरी' : राम शेवाळकर / मधु जामकर / २३
  मालविका / डॉ. सुलभा हेर्लेकर / ३२

- **नोंदी :** नवे प्रश्न नवी आव्हाने / डॉ. मधुसूदन चान्सरकर / ३५

- **पत्र-परिषद्** जी. ए. कुळकर्णी यांची तीन पत्रे / ३७

- **भवताल :** पाच भारतीय इंग्रजी कविता कवी : आदित्य शंकर / अनुवाद : किरण येले / ३९

- **प्रतिसाद :** गौरीच्या नायिका : द्विविध आकलन / डॉ. द. भि. कुळकर्णी / ४१

- वि. सा. संघाचे कार्यवृत्त / ४४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

।। विंदांच्या कवितांचे स्त्रीवादी पुनर्वाचन ।।

(कावेरी डोंगरे, गर्भाधान आणि झपताल या कवितांच्या आधारे)

■ प्रा. प्रकाश महादेव दुकळे

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त विंदा करंदीकर हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी कविता, बालकविता, ललित निबंध, समीक्षा, अनुवाद, इंग्रजी समीक्षा, काव्यवाचन अशा क्षेत्रात वाङ्मयीन मुशाफिरी केली आहे. पण 'कवी विंदा करंदीकर' या नावानेच ते समाजमनात रूजले आहेत. १९६० नंतर भारतीय वाङ्मयात स्त्रीवाद हळूहळू रूजू लागला. या स्त्रीवादाच्या अनुषंगाने विंदा करंदीकरांच्या कवितांकडे पाहिल्यास त्यांच्या कवितांचे नवे दर्शन घेता येते. त्या कवितांचे आपण पारंपरिक वाचन करतो. त्यामुळे आपल्यासमोर पारंपरिक अर्थ येतात. पण स्त्रीवादी दृष्टिकोणातून पुनर्वाचन केल्यास त्या कवितांमधून प्रतीत होणारे अर्थ बदलतात. यासाठी आपण 'कावेरी डोंगरे', 'गर्भाधान' व 'झपताल' या कवितांचे प्रातिनिधिक स्वरूपात विचार करू.

स्त्रीवादी पुनर्वाचन

स्त्रीवादी पुनर्वाचन समजून घेण्यापूर्वी स्त्रीवाद म्हणजे काय ? हे समजून घ्यावे लागेल. मानव जातीच्या इतिहासाइतका स्त्रीजातीवरील अत्याचार पुरातन आहे. प्रत्येक स्त्री मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अशा वेगवेगळ्या भूमिका आपल्या जीवनात पार पाडत असते. पुरुषसत्ताक समाजाने स्त्रीला कुठल्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. स्त्रीने कुटुंबासाठी स्वतःचे अस्तित्व विसरून दुसऱ्याची सेवा-शुश्रुषा करणे, त्याग करणे यात आपले आयुष्य खर्च केले. स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहाण्यापेक्षा समाज तिच्याकडे 'बाई' म्हणून पहातो. सिमॉन द बोव्हा यांच्या मते, 'बाई म्हणून कोण जन्माला येत नाही. नंतर तिला बाई बनवलं जातं.' कुटुंब किंवा समाज मुलीवर बाईपणाचे संस्कार लादते.

स्त्रीवादाविषयी आपल्याला असे म्हणता येईल की, स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे. तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मियता वाटणे. तिला तिचे हक्क-अधिकार कळणे. तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीने 'बाईपणाची' कात टाकून 'माणूसपणाचे' नवे रूप धारण करणे स्त्रीवाद होय. स्त्रीला तिच्या गुलामीची आणि शोषणाची जाणीव होणे आणि गुलामी व शोषण यांच्या विरोधात बंड करणे त्यालाच 'स्त्रीवाद' असे नाव देता येईल.

स्त्रीवादाविषयीचे वरील विवेचन पहाता साहित्यात उमटलेला स्त्रीवाद हा 'स्त्रीकेंद्री' आहे; असे आपल्याला जाणवते. त्यामुळे अशा स्त्रीवादी समीक्षेचे वर्णन करताना डॉ. अश्विनी धोंगडे म्हणतात, 'वाङ्मयीन कलाकृतीकडे पाहण्याची स्त्रीकेंद्री दृष्टिकोण आणि समाजातील रूढ पितृसत्ताक पद्धतीला वाङ्मयीन समीक्षेच्या माध्यमातून दिलेला धक्का.''[१] या विधानाप्रमाणे विंदा करंदीकर यांच्या कवितेचे आपण स्त्रीवादी पुनर्वाचन करणे गरजेचे आहे. कारण पारंपरिक वाचनाने पुरुषप्रधान दृष्टिकोणातून त्या तीन कवितांचे वाचन करणे म्हणजे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या कवितांवर अन्याय केल्यासारखे होईल.

पारंपरिक वाचनाचे अर्थ

विंदा करंदीकरांवर मार्क्स व फ्रॉइड यांचा प्रभाव पडला आहे. तो सामाजिक जाणिवांच्या कवितेमध्ये जाणवतो. स्त्रीदर्शन घडविणाऱ्या कवितेवर फ्रॉईडचा अधिक प्रभाव दिसतो. फ्रॉइडच्या मते अबोध मनात अनेक तऱ्हेच्या वासना लैंगिक इच्छा गंड यांचे वास्तव्य असते. त्यांना सामाजिक निर्बंधांमुळे मोकळी वाट मिळत नाही. त्यामुळे त्या वासना - इच्छा दडपल्या जातात आणि प्रकट मनाच्या पृष्ठभागावर येण्याचा प्रयत्न करतात. या इच्छा-वासनांनी व्यक्ती पछाडली जाते. किंवा विकृती निर्माण होतात. ती व्यक्ती आत्मशोधासाठी प्रवृत्त होते. हा शोध त्याच्याशी निगडित असलेल्या प्रकट-अप्रकट मनात संघर्ष सातत्याने चालू असतो. करंदीकरांच्या 'गर्भाधान' व 'कावेरी डोंगरे' या दुभंगलेल्या मनाचे दर्शन घडवणाऱ्या कवितांचा मानसशास्त्रीय अर्थ लावता येईल.

'कावेरी डोंगरे' हे करंदीकरांनी रेखाटलेले व्यक्तिचित्र आहे. ही कविता म्हणजे एक नवकथा वाटते. कावेरी डोंगरे ही रेशनिंग ऑफिसात कारकुनी करणारी तरुण मुलगी आहे. ती मध्यम वर्गातील आर्थिक परिस्थिती बेताचीच असणाऱ्या कुटुंबातील आहे. कॉलेजात असताना गुंड्या गोखलेचे तिच्यावर प्रेम असते, पण शेवटी तो हुंडा आणि जागा यांचा हिशोब करून व व्यवहार पाहून तिला लग्नाला नकार देतो. त्यासाठी कारणे तो नेहमीची सांगतो, ती म्हणजे - आजारी आईने गळ घातली, मंगळ आडवा आला इ. कावेरी डोंगरे आपली चुरगळुन गेलेली सुखी जीवनाची साधीसुधी स्वप्ने खोल मनात दडपून रेशनिंग ऑफिसात 'ए' फार्मचे कोड तपाशीत बसते. बाजूच्या मंदा एकबोटे किंवा चंपा साखरे यांच्याप्रमाणे कावेरीला तुळतुळीत भांगांच्या मुळमुळीत तरुण मुलांना फिरवता येत नाही. त्यांचे हे यश तिच्या लांबट भूवयांवर आंबट आठ्या उठवते. गुंड्या गोखलेच्या नवीन अपत्याचे कार्ड तिलाच बनवावे लागते. कॉलेजातल्या गोड स्वप्नात गुंड्या गोखलेच्या प्रियाराधनात ती मनाला गुंतवून टाकण्याचा प्रयत्न करते. पण 'आरो'च्या टेबलावरची घंटा मध्येच वाजते. तिचे स्वप्नरंजन भंग पावून तिला वास्तव्यात आणले जाते. कॉलेजातल्या पोरांनी तिच्या नावावर केलेल्या बीभत्स कोट्या आठवून तिच्या तारुण्यसुलभ गुलाबी भावना साडी विटावी तशा विटतात. लग्न करावे, संसार थाटावा, मुले व्हावीत ही कावेरीची साधीसुधी इच्छा पूर्ण होत नाही. टेबलावरच्या फाटक्या चिटोऱ्यावर बाळाचे चित्र काढून आपल्या अतृप्त मनाची भावना व्यक्त करते. त्याचवेळी तिच्या पुढ्यातून एक म्हातारा दुधाचे कार्ड घेऊन जातो. तरुण मुलीच्या मनाचा कोंडमारा आणि म्हाताऱ्याला होणारी पोरे या दोन्ही घटना एकत्र आणून करंदीकर सामाजिक विसंगती प्रकट करतात.

'गर्भाधान' या कवितेत एका स्त्रीची गर्भधारणा झाल्यानंतर मातृत्वाच्या विचाराने तिच्या मनात निर्माण झालेली भावअंदोलने प्रकट झाली आहेत. एका रात्रीच्या वेळी पतीच्या समागमातून तिला गर्भ धारणा झाल्याचा भास होतो. आणि पोटात भीतीचा गोळा उठतो. नऊ महिन्यांनी येणाऱ्या भेसूर क्षणाची म्हणजे मातृत्वाची तिला जाणिव होते. खरे तर मातृत्व ही सर्व श्रेष्ठ प्रिय गोष्ट पण ते प्राप्त होण्याआधीचे क्लेश व एकाकीपणा तिला भयंकर वाटतो. मातृत्वाच्या आठवणीने ती अगतिक बनते. त्याचवेळी तिचा पती संभोगासुखाच्या गोड ग्लानीत बेफिकिरीपणे झोपलेला असतो. तिला नऊ महिन्यांनी येणारे बाळंतपण, ओकाऱ्या, मृत्यूची कराल दाढ दिसते. हे सगळे एकटीनेच भोगायचे ? त्यामुळे पती विषयी तिला राग वाटतो. त्याचा प्राण घ्यावासा वाटतो. पण नंतर तिचा तिला राग वाटतो. कारण तो पतीच तिला प्रिय असतो. तिच्यासाठी त्यानेच त्याग केला होता. त्याचे स्पर्श तिलाही सुखावह वाटलेले असतात. त्यामुळे ती आपले सुप्त मन दाबून ठेवून त्याच्याच कुशीत आपले रेशमी डोके खुपसून, त्याला शरण येते. त्याच्या घोरण्यात आपला उष्ण हुंदका अस्फुटपणे हुंकारते. मनातले विद्रोही विचार ती दाबून टाकते. म्हणजेच 'पती हाच परमेश्वर' हे सूत्र स्वीकारते. या कवितेविषयी डॉ. विजया राजाध्यक्ष म्हणतात, ''स्त्रीची

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानसिक आंदोलने 'गर्भाधान' मध्ये अशा तऱ्हेने चित्रित केली आहेत की त्यामुळे तिच्या माता या प्रतिमेला गुंतागुंतीचे - आणि म्हणून आधिक वास्तव रूप यावे आणि त्या रूपाची छाया कवितेतील स्त्री - पुरुषसंबंधावरही पडावी''[२] या कवितेत करंदीकर स्त्रीचे उदात्तीकरण न करताही तिच्याविषयीची करूणा आणि आदर व्यक्त करतात.

'झपताल' ही कविता एक तालचित्र आहे. झपताल हा दहा मात्रांचा ताल असतो. संथ लयीपेक्षा जलद लयीत आपले व्यक्तित्व अधिक समर्थपणे व्यक्त करणारा हा ताल असतो. झपतालच्या दहा मात्रांच्या कालात चोवीस मात्रा वाजवणे ही तबलावादनातील अवघड गोष्ट आहे. या अवघड तालाप्रमाणे अवघड असा सांसारिक जीवनातील सर्व घडामोडी, सर्व प्रसंग जगणाऱ्या एखाद्याच गृहिणीला ही किमया वेगळ्या अर्थाने शक्य असते. कारण दिवसाच्या चोवीस तासात येणारे सर्व प्रसंग ती निभावून नेते. पहाटे ओचे बांधून ती उठते. तेव्हापासून ती रात्रीपर्यंत झपाझप काम करत असते. कुरकुरणाऱ्या पाळण्यातील बाळाला पाजते. म्हातारी चूल पेटवते. दहा फुटी खोली तिच्या तल्लीन जगण्याचे केंद्र आहे. बाळाची तीन मुतेले वाळविण्यासाठीच सूर्य उगवतो. नवऱ्याच्या स्वप्नांना पायातील मांजरासारखी लुडबुड करू देत नाही. घरभर ती भिरभिरते. प्रत्येक वस्तूमध्ये तिची प्रतिबिंबे दिसतात. सुहासिनी, यक्षिणी, पक्षिणी, संहिता व स्वप्नसती अशा विविध भूमिका ती पार पाडते. झपतालाच्या दहा मात्रात चोवीस मात्रा वाजवाव्या, त्याप्रमाणे संसाराच्या दहा फुटी खोलीत दिवसाच्या चोवीस मात्रा ती चपखल बसवते. हीच तिची किमया ठरते. गरीब परिस्थितीत संसार करणाऱ्या एका स्त्रीची जीवननिष्ठा या ठिकाणी दिसून येते.

स्त्रीवादी पुनर्वाचनाचे अर्थ

'कावेरी डोंगरे' या कवितेत एका पुरुषाने एका स्त्रीवर अन्याय केला आहे. या प्रकारचा अन्याय पुरुष स्त्रीवर दीर्घकाळ करत आला आहे. गुंड्या गोखले कॉलेज जीवनात कावेरी डोंगरे बरोबर चंगळ करतो. विचारी कावेरी त्याच्या मोहजालात फसते. गुंड्या हा लग्नाला नकार देतो. ही समस्या अनेक स्त्रियांची वाटते. गुंड्या हा पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रतिनिधी वाटतो. पुरुष स्त्रीमधील नाविन्य शोधतो. ते संपले की त्या स्त्रीशी संबंध तोडतो. मग कावेरीची संसाराची, मुलांची स्वप्ने भग्न पावतात. तिच्या गुलाबी भावना विटून जातात. कॉलेज तरुण एखाद्या तरुणीविषयी बीभत्स शब्द लिहून तिला हिणवण्याची प्रथा जुनीच आहे. 'डोंगर पोखरून निघाला उंदीर !' या फळ्यावरील शब्दांनी तिला रक्तबंबाळ केले जाते. कारकुनीची नोकरी करत असताना ती गुलाबी स्वप्नेही रंगवू शकत नाही. कारण आरोच्या टेबलावरील घंटा तिचे स्वप्नरंजन भग्न करते. स्वत:ला मुल होण्याच्या नैसर्गिक भावना कागदावरती चित्राच्या रूपाने रेखाटत असतानाच करकरणारे कोकणी पायताण आवाज करत तिच्या भावनांचा चुराडा करतात. तिच्याचकडून एक म्हातारा आपल्या बालकाचे दुधाचे कार्ड घेऊन जातो. एकीकडे तरुणीचे लग्न नाही; म्हणून मुले नाहीत आणि दुसरीकडे म्हातारपणात मुलांना जन्म देणारा एक पुरुष येथे दिसतो. एकंदरीत कावेरीवरील अन्याय हा एक स्त्री म्हणून झालेला आहे. करंदीकरांनी स्त्रीवादी दृष्टिकोणातून या कवितेकडे पाहिले असते तर कावेरीने प्रेमाचे रंग खेळणाऱ्या आणि नंतर नकार देणाऱ्या गुंड्याला जाब विचारला असता. बीभत्स शब्द लिहिणाऱ्यांना खडसावले असते. स्वप्नभंग करणाऱ्या आणि म्हातारपणात मुलांना जन्म देणाऱ्या समाजाला तिने जाब विचारला असता. पण करंदीकर कावेरीकडे फक्त सहानुभूतीच्या, मानवतेच्या व करूणेच्या नजरेने पहातात. म्हणून कावेरीवर अन्याय झाला आहे. स्त्रीवादी दृष्टिकोणातून कावेरीकडे पाहिले असते, तर तिला स्वत्वाची जाणीव होऊन संघर्षप्रवण बनली असती. तिने आपल्या शोषणाविरूद्ध आवाज उठविला असता. पण करंदीकरांनी पारंपरिक दृष्टिकोणातून कावेरीकडे पाहिल्यामुळे कावेरीवर अन्याय झाला आहे.

'गर्भाधान' या कवितेतील नायिका कावेरीपेक्षा थोडी धीट आहे. पण शेवटी ती पुरुषाचे वर्चस्व मान्य करते. पुरुषाविषयी घृणा, संताप आणि कृतज्ञता या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावना एकमेकींत मिसळून त्याचे एक संमिश्र रसायन तयार झाले आहे. तिची मानसिक भाव आंदोलने व्यक्त होतानाच तिच्या मनातील अंगारही व्यक्त होतो. गर्भधारणेच्या जाणीवेने तिची बोटे व डोळेही लाल झाले आहेत. पुरुष समागमानंतर गोड ग्लानीत झोपतो. पण स्त्रीला विवंचना घेरते. कारण समागमानंतर पुरुषाचे काम संपते आणि स्त्रीचे काम सुरू होते. मुल हे दोघांचे असले तरी सारा भार स्त्रीलाच सोसावा लागतो. एकटेपण, ओकाऱ्या, मृत्यूच्या दारापर्यंत नेणारे बाळंतपण तिला एकटीलाच सहन करावे लागते. यामुळे तिला त्याचा राग येतो. त्यावेळी ती म्हणते,

> "आपण घ्यावा याचाच प्राण...
> याला तुडवावें, बडवावें, रडवावें."

आपल्या मनातील ती खरी प्रतिक्रिया व्यक्त करते. माणूस जेव्हा रागावतो तेव्हाच खरी प्रतिक्रिया व्यक्त करतो. स्त्रीवादाच्या अनुषंगाने इथपर्यंतचे चित्रण ठीक होते. पण करंदीकर तिच्याकडे पारंपरिक दृष्टीने पहात असल्यामुळे ती पतीला शरण येते. आणि त्याच्याच कुशीत डोके खुपसून अस्फुट हुंदका देते. विजेचे बटण बंद करते, म्हणजे मनातील चिड, संताप थंड करते. पण तिचा उष्ण हुंदका बरेच काही सांगून जातो. या कवितेकडे स्त्रीवादाच्या अनुषंगाने पाहिले असता एका पुरुषाने स्त्रीवर अन्याय केला आहे. त्या अन्यायाला जाब ती विचारणार असते. पण करंदीकरांची पारंपरिकता तिला गप्प बसवते. तो मात्र बिनघोर घोरतो. म्हणजे त्याची बेडर, बेफिकीर वृत्ती दिसते. ती गर्भधारणेनंतर अंतर्बाह्य हादरून जाते. तिचे हे हादरलेपण, राग, संताप, चिड, उद्वेग, विद्रोह अजूनही प्रकट व्हायला हवा होता. पण तो झाला नाही. याचे कारण करंदीकर तिच्याकडे स्वतः एक पुरुष म्हणून किंवा नर म्हणून पहातात. स्त्रीवादाच्या अनुषंगाने पहात नाहीत हेच सिद्ध होते.

'झपताल' या कवितेत पन्नास वर्षापूर्वीच्या संसारी स्त्रीचं शब्दचित्र रेखाटलं आहे. स्वतःच्या संसारासाठी रात्रंदिन राबणाऱ्या पत्नीबद्दल कौतुक आणि आदर पती व्यक्त करतो. या कवितेत स्त्रीबद्दल कौतुक आणि कृतज्ञता असली तरी पुरुषप्रधान संस्कृतीतून निर्माण झालेले स्वामित्व सिद्ध होते. स्त्रीचे स्त्रीपण हे संस्कृतिसापेक्ष असते. संसारासाठी स्त्रीने घरात चोवीस तास गुंतवून घेतलं पाहिजे. प्रत्येकासाठी खस्ता खाल्ल्या पाहिजेत. प्रत्येकाची वेळ साधली पाहिजे. मुळात तिने स्वतःसाठी काही न करता दुसऱ्यासाठी झटले पाहिजे. यातच 'आदर्श नारी' पण दडले आहे. ही भावना यात दडली आहे. करंदीकरांच्या कवितेतील स्त्री-रूपे उलगडून दाखविताना दीपक घारे यांनी करंदीकरांच्या संस्कृतीनिष्ठ विचारावर बोट ठेवताना म्हटले आहे. "स्त्रीवादानंतरच्या आजच्या पिढीला ही कविता तितकी भावणार नाही, थोडीशी कृतकही वाटेल. विंदांनी या कवितेत जी विशेषणं वापरली आहेत ती स्त्रीत्वाचा सांस्कृतिक परीघ स्पष्ट करतात."[३] या विधानातून करंदीकर पारंपरिकतेला किंवा स्त्री प्रतिमेला धक्का लावत नाहीत हे दिसते.

स्वागतासाठी 'सुहासिनी' असतेस; वाढताना 'यक्षिणी' असतेस; भरवताना 'पक्षिणी' असतेस, साठवताना 'संहिता' असतेस; भविष्याकरिता 'स्वप्नसती' असतेस; या ओळीतून स्त्रीकडून पुरुषप्रधान समाजाच्या अपेक्षा व्यक्त झाल्या आहेत. स्वतःचे दुःख पुसून सुहास्य वदनाने स्वागत करणारी ती सुहासिनी असते, दारिद्र्याची स्थिती पालटणारी यक्षिणी असते, स्वतः न खाता मुलांना भरवणारी पक्षिणी होते, संसाराची साठवण करणारी संहिता असते आणि भविष्यकाळात सुखी दिवस आणण्यासाठी स्वतःची स्वप्ने सती चढवणारी स्वप्नसती असते. म्हणजे तिचे कौतुक करतानाच संसारातील अपूर्णता तिच्या सोशिक स्वभावाने पूर्णता आणून देणारी असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. पितृसत्ताक समाजाने तिच्याकडून वरीलप्रमाणे अपेक्षा व्यक्त करून तिच्या स्त्रीत्वाचा बळी दिला आहे. चोवीस तासाचे चक्र म्हणजे तिचे दमन चक्र आहे. तिच्यावर बाईपण लादून तिच्याकडून अनेक अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

स्त्री जातीवरील अन्याय हा पुरातन आहे. संस्कृतीच्या नावाखाली तिच्या इच्छा-आकांक्षा दडपून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टाकल्या गेल्या. संस्कृतीसापेक्ष दृष्टीने तिच्याकडे समाजाने पाहिले आहे, त्याच दृष्टीने अनेक कवींनीही पाहिले आहे. पारंपरिकतेने कवितांचे अर्थ हे संस्कृतीनिष्ठ असतात, हे लक्षात येते. स्त्रीवादी पुनर्वाचन स्त्रीकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण आपणच देतो.

■■■

संदर्भ टीपा :

१. डॉ. धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा - स्वरूप आणि उपयोजन; दिलीपराज प्रकाशन, पुणे. पृष्ठक्रमांक - ४३
२. संपादक : राजाध्यक्ष विजया, आदिमाया, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पृष्ठक्रमांक : वीस (प्रस्तावना)
३. घारे दीपक, ललित (विंदा करंदीकर विशेषांक), एप्रिल २००६ पृष्ठ क्रमांक ४२

वि. सा. संघाची प्रकाशने

- **मराठी वर्णोच्चार विकास :** डॉ. द. ह. अग्निहोत्री — १६.०० रु.
- **लोक साहित्य संपदा :** संपा. ना. रा. शेंडे — ६.०० रु.
- **आणखी गडकरी :** डॉ. मधुकर आष्टीकर — १०.०० रु.
- **केशवसुत वाङ्मय सूची :** सौ. उज्ज्वला आयाचित — १.०० रु.
- **तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७** डॉ. र. शं. केळकर — ४.०० रु.
- **'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथा संग्रह (१९८०)** संकलन प्रा. ज. रा. फणसाळकर — २०.०० रु.
- **समग्र बजावा :** संपादन/संकलन - द. भा. प्रधान — २०.०० रु.
- **हिंदी-मराठी भाषा प्रवेशिका :** श्रीमती मालतीबाई श्रीखंडे — ४.०० रु.
- **ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३-१९९३)** संपादन डॉ. आशा सावदेकर — ३०.०० रु.
- **दक्षिणेतील दोन आचार्य :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी — ५.०० रु.
- **मराठी गद्य :** प्रा. श्री. गो. काशीकर — ३.०० रु.
- **कविता विदर्भाची :** संपादक डॉ. सौ. आशा सावदेकर — ५०.०० रु.
- **छंदशास्त्र : एक अध्ययन :** कुंदर दिवाण — १०.०० रु.
- **वसंत वैभव : (कै. व. कृ. वऱ्हाडपांडे)** संपादन डॉ. सौ. कुंदा केळापुरे /डॉ. मदन कुळकर्णी — ८०.०० रु.
- **धन्यतेची थाप (निवडक प्रस्तावना)** डॉ. वि. भि. कोलते — १००.०० रु.
- **वक्ता दशसहस्रेषु :** (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) - संपादक : डॉ. वि. स. जोग — १२५.०० रु.
- **अध्यक्षीय भाषणे : खंड १ :** संपादक तु. ना. काटकर — ७५.०० रु.
- **अध्यक्षीय भाषणे : खंड २ :** संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी — २५०.०० रु.
- **विविध प्रवाही साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे :** संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी — २५०.०० रु.
- **युगवाणी साहित्य सूची :** संपादक केशव जोशी — ७०.०० रु.
- **युगवाणी साहित्य सूची (पूरवणी) :** संपादक : केशव जोशी — ५०.०० रु.
- **वैदर्भीय साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९)** संपादन : वामन तेलंग — २००.०० रु.
- **सांजदिव्याचे झुंबर - शिवा राऊत (निवडक कविता)/** संकलन/संपादन डॉ. आशा सावदेकर/वामन तेलंग — ६०.०० रु.
- **कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुट लेखन : ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम** (संपादक प्रा. राम शेवाळकर) — ३००.०० रु. (प्रत्येकी)
- **युगवाणी, माडखोलकर विशेषांक १९९८ :** संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर — ४०.०० रु.
- **कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक : (२००४-०५), युगवाणी :** संपा. डॉ. सुलभा हेर्लेकर — ४०.०० रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ धुळे परिसरातील दलितांची बोली ॥
अहिराणी बोलीचा ठळक सामाजिक भेद

प्रा. प्रकाश भामरे

: १ :

प्रत्येक समाजाची स्वत:ची बोलीभाषा असते. त्या बोलीभाषेचा वर्णनात्मक पद्धतीने जसा अभ्यास केला जातो, तसा सामाजिक अंगानेही अभ्यास केला जातो. अशा प्रकारच्या सामाजिक दृष्टीने केलेला बोलीभाषेचा अभ्यास समाजभाषावैज्ञानिक अभ्यास ठरतो.

बोलीभाषेचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास हा त्या विशिष्ट समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक घटकांचा अभ्यास ठरतो. भाषा आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध किती घनिष्ठ आहे हे सर्वश्रूत आहे. 'संस्कृतीचे व्यक्त रूप म्हणजे त्या समाजाची बोलीभाषा होय' प्रत्येक समाजाची विशिष्ट संस्कृती असते. त्या संस्कृतीला ती विशिष्ट बोलीभाषा व्यक्त करते असते. म्हणून 'बारा कोसावर भाषा बदलते' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्यात 'भौगोलिकता' असते. परंतु प्रत्येक जातीची बोलीभाषा वेगळी असते; असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा त्यात 'सामाजिकता' अनुस्युत असते. भाषेच्या वर्णनात्मक अभ्यासापेक्षा ही दिशा वेगळी आहे.

प्रत्येक माणूस बोलीभाषेच्या टप्प्यातून पुढे येत-येत अनेक भाषा आत्मसात करतो; परंतु त्याच्या मायबोलीची जागा, तिचे त्याच्या जीवनातील महत्त्व दुसरी कोणतीही भाषा हिरावून घेऊ शकत नाही. असे असताना तथाकथित प्रमाणभाषेचे ठेकेदार बोलीभाषांना अशुद्ध, गावंढळ ठरवितात. हे कितपत योग्य आहे ? डॉ. गंगाधर पानतावणे बोलीभाषेविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणतात, ''प्रमाणभाषा, उत्तम मराठी, सुसंस्कृत मराठी असे शब्दप्रयोग जेव्हा कानांवर आदळतात; तेव्हा त्यांचे स्पष्टीकरण करणे आवाक्याबाहेरचे असते. हे शब्दप्रयोग आले की, स्वाभाविकच इतर अभिव्यक्ती अप्रमाण, हिणकस ठरविण्याचा प्रयत्न होतो. सामाजिक दळणवळणातील हा अडसर सामाजिक संवादाला नेहमीच बाधा आणीत असतो.''[१]

डॉ. ना. गो. कालेलकर बोलीभाषेविषयी म्हणतात, ''बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची 'स्वाभाविकता' हेच तिचे वैशिष्ट्य असते. काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल, हा ज्याच्या-त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्काराचा प्रश्न आहे.''[२]

अहिराणी बोली ही खान्देशातील महत्त्वपूर्ण बोलीभाषा आहे. या बोलीभाषेला प्राचीन इतिहास आहे. संशोधकांच्या मते 'आभिरांची किंवा अहिरांची वाणी ती अहिराणी' हे मत मान्य पावले आहे. अहिराणी बोलीभाषेचे विभागानुसार अनेक भेद दृष्टीस पडतात. धुळे परिसर हा अहिराणी बोलीचा केंद्रप्रदेश मानला जातो. अहिराणी बोलीभाषेत जसे विभागानुसार 'प्रादेशिक भेद' निर्माण झाले आहेत. तसेच जाती-जमातीनुसार तिच्यात 'सामाजिक भेद' निर्माण झाले आहेत. धुळे परिसरातील दलित समाजाची म्हणजेच

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महार' जातीची अहिराणी बोली कसे सामाजिक वेगळेपण धारण करते. हा प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे. धुळे परिसरातील महार समाज अहिराणी बोलीच बोलतो. परंतु महार समाजाची अहिराणी बोली व महारेतर समाजांची अहिराणी बोली यात ठळक सामाजिक भेद आहे. तो सामाजिक भेद भाषेच्या अभ्यासकांसमोर मांडणे ही शोधनिबंध लेखनामागची माझी प्रामाणिक भूमिका आहे.

बोलीभाषा आणि समाज यांतील परस्परसंबंध अतिशय घनिष्ट असतात. त्यामुळे बोलणाऱ्या व्यक्तीच्या भाषेतून त्याचा समाजच प्रकट होतो. समाजात अनेक कारणांमुळे वेगवेगळे स्तर निर्माण होतात. शिक्षण, व्यवसाय, शहरी, ग्रामीण, जाती-जमाती, धर्म इ. अनेक कारणांमुळे समाजात लहान-मोठे गट अस्तित्वात येतात. या गटांची भाषापद्धती भिन्न-भिन्न असते. काही बाबतीत जाणवण्याइतके 'वेगळेपण' असते. हे वेगळेपण धुळे परिसरातील महार जातीच्या अहिराणी बोलीच्या बाबतीत सोदाहरण सांगता येईल.

आपल्याकडे बोलीभाषांबद्दल आजही अनेक गैरसमज आढळतात. वास्तविक बोलीभाषा या सामाजिक आणि भौगोलिक वैशिष्ट्यांनी निश्चित होणारी भाषेची स्वाभाविक विविध रूपे आहेत. शुद्ध-अशुद्ध ही कल्पना भलत्याच ठिकाणी लावून चालणार नाही. बोलींबद्दलचे गैरसमज वाढण्याला आपल्याकडची सामाजिक रचना बव्हंशी कारणीभूत आहे. ह्यासाठी आपण एखाद्या खेड्याची रचना लक्षात घेतली म्हणजे आपल्याला याची सत्यता पटेल. एका जातीच्या लोकांनी एका विशिष्ट भागातच राहणे, विशिष्ट प्रकारचे कपडे नेसणे, विशिष्ट अन्नप्रकार ग्रहण करणे. विशिष्ट रूढी, परंपरा, संकेत पाळणे, विशिष्ट देव-देवतांची उपासना करणे इ. गोष्टीत त्यांच्यावर असलेले सामाजिक निर्बंध, त्यामुळे त्या-त्या जातीय गटात भाषिक वैशिष्टचे निर्माण झाली. त्यामुळे आपल्याला विशिष्ट जातीचे शब्दप्रयोग, उच्चार वैशिष्टये यांची इतकी सवय झाली आहे की, त्या शब्दप्रयोगातून, उच्चारावरून आपण त्या व्यक्तीची जात, प्रदेश लगेच ओळखू शकतो. म्हणून अशा प्रकारच्या भाषाभेदांना शुद्धाशुद्ध न मानता त्यांचे खुल्या मनाने स्वागत झाले पाहिजे.

अशा भूमिकेतून धुळे परिसरातील दलित बोलीकडे म्हणजेच महार जातीच्या अहिराणी बोलीकडे बघता येईल. 'महार जात' समाजव्यवस्थेतील वैशिष्ट्यपूर्ण जात आहे. या जातीची विशिष्ट जीवनपद्धती होती. ही विशिष्ट जीवनपद्धती त्यांच्या गावकुसाबाहेरील जगण्यातून निर्माण झाली होती. या आगळ्या-वेगळ्या जीवनपद्धतीला व्यक्त करणारी विशिष्ट अहिराणी बोली आहे. स्थानिक पातळीवर, शाब्दिक पातळीवर, वाक्यांच्या पातळीवर, वाक्प्रयोग-म्हणी यांच्या पातळीवर हे समाजभाषिक वेगळेपण अभ्यासता येईल.

स्वनिक किंवा उच्चाराच्या पातळीवरील भेद

	महार जातीची अहिराणी	महारेतर जातीची अहिराणी	प्रमाण मराठी
१.	बलायं	बलावं	बोलविले
२.	आठूय	आठून	इथून
३.	झायेर	झावर	गोधडी
४.	रगत	रंगत	रक्त
५.	आमे	आमु	आम्ही
६.	गिठोई	आठोई	आठोळी
७.	कवाड	कावड	दरवाजा
८.	मुतला	मुकला	जास्त
९.	शाबू	साबू	साबण
१०.	कशाले	कसाले	कशाला
११.	आखो	आखू	अजून
१२.	आयनं	आलनं	अळनी

शाब्दिक पातळीवरील भेद किंवा वेगळेपण

	महार जातीची अहिराणी	महारेतर जातीची अहिराणी	प्रमाण मराठी
१.	तई-बत्ता	सी-वरला	पाटा-वरवंटा
२.	बनाद	धाबोई	चादर
३.	शेरी	बोय	बोळ
४.	सोटी	पयकाठी	पळकाठी
५.	पांघुर	धोतीर	धोतर
६.	डालकी	डुली	टोपली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

७.	कयक	पुरानं	कळक
८.	मोगरी	बडोनी	मोगरी
९.	बिटकं	लोटा	मडके
१०.	रांड मूंड	रांडोय	विधवा
११.	धुडा	फडकं	फडके
१२.	तगारी	कढाय	कढई
१३.	तम्हान	थाटी	थाळी
१४.	मुक्या	गुयन्या	गुळन्या
१५.	सयसान	संध्याकाय	संध्याकाळ
१६.	गाभरू	पोऱ्या	मुलगा
१७.	वट्टा	जोतरं	ओटा
१८.	नांदडं	संपूट	टाकी
१९.	मईस	काजय	काजळ
२०.	गंदोरं	मोथीर	गंधर्व विवाह

अशाप्रकारे उच्चाराच्या पातळीवरील आणि शाब्दिक पातळीवरचा हा भेद सोदाहरण सांगता येईल. अशाप्रकारचे शेकडो शब्द महार समाजाच्या अहिराणी बोलीत आढळतात. महार समाजाचे आहार विहार, कपडे नेसण्याच्या पद्धती, देव-देवता, विवाहप्रथा, मर्तिक प्रथा, लोकसमज, श्रद्धा-अंधश्रद्धा, महारेतर समाजापेक्षा वेगळ्या आहेत. या गोष्टींना व्यक्त करणारी या समाजाची बोलीभाषा आपोआपच वेगळेपण धारण करते. रणबल्या, काढ्या, शेणना कुकू, पोटखाले येयेल, शाक, पार, ढसकन, आकडी, गोर, माटी, पड, ढोक्या, आवल्यामाय, भादीमाय, कांजी, घुसना, गवश्यापणा, देरवट, पयलं घर, सवत सूत इ. शब्द किंवा शब्दबंधांना सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ असल्या कारणाने ते महारेतर समाजाला पूर्वपरिचयाशिवाय कळणार नाही. एकाच गावातील इतर समाजातील अहिराणी बोली बोलणाऱ्या व्यक्तींना या शब्दांचे अर्थ सांगता येणार नाहीत एवढे वेगळेपण या बोलीभाषेत आहे.

प्रत्येक समाजाच्या बोलीभाषांमध्ये ज्या 'म्हणी' किंवा 'वाक्प्रयोग' वापरले जातात. त्यांच्यामागे एक परंपरा असते. त्या समाजाच्या लोकजीवनातील अनेकविध अनुभव म्हणी व्यक्त करीत असतात. म्हणींच्या संस्कृतिदर्शनामुळे त्या-त्या समाजाच्या लोकपरंपरा समजण्याचा मार्ग मोकळा होतो.

उदा. महार जातीच्या काही विवाहविषयक परंपरा आहेत. रीतीरिवाज आहेत. ती रीत माहीत असल्याशिवाय त्या म्हणीची लक्षणा इतरांना कळणार नाही.

"बाईना फुले बाईले नि शाबासी मन्हा याहीले" या म्हणीतील प्रत्येक शब्दाचा अभिधात्मक अर्थ व लाक्षणिक अर्थ वेगळा आहे. बाई=नववधू, फुले= लग्नकार्यासाठी वधूपित्याला मिळालेली मदत, याही = व्याही. मुलीच्या नावाने मिळालेल्या पैशांतून लग्नकार्य पार पाडून, कुठल्याही प्रकारचे आर्थिक योगदान नसताना धन्यतेस पात्र ठरणे. हा या म्हणीचा अभिधात्मक अर्थ असून, एकाच्या त्यागाचा लाभ दुसऱ्याला होणे किंवा काहीही न करता एखाद्याला समाजात मोठेपण प्राप्त होणे अशी या म्हणीची लक्षणा आहे. असा अर्थ व्यक्त करणाऱ्या म्हणी महार जातीच्या अहिराणी बोलीत विपुल प्रमाणात आढळतात.

उदा. 'आखाडच्या याय नि भाकरीसना काथ'

'तुले माले सांगाले, भगतीस लयनू घूमाले'

पाटील मातस ते वावर लेस, महार मातस ते बायको करस'

'एक लुगडाले चार-चार गाठी नि मन्हा बापपान गावनी काठी'

उपरोक्त म्हणीचें सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ कळल्याशिवाय या म्हणींचे अर्थ इतर जातीतील लोकांना समजणार नाहीत. महार जातीच्या या अहिराणी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे आहे. जाती-जमातीनुसार भाषाभेद सर्वत्र आढळतात. त्याला धुळे हा अहिराणीचा केंद्रप्रदेशही अपवाद नाही. जातीची सामाजिक प्रतिष्ठा आणि भाषेची सामाजिक प्रतिष्ठा एकाच मापाने मोजली जाते. प्रमाण भाषांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली दिसते. परंतु अस्सल देशी शब्दांचा भरणा असलेल्या बोलीभाषा गावंढळ समजल्या जातात. त्यातून 'महार' जातीसारख्या पूर्वास्पृश्य जातीच्या बोलीभाषेला हीन लेखण्याची प्रवृत्ती आजही अस्तित्वात आहे. महार जनमानस, महार संस्कृती, महार लोकजीवन जाणून घेण्यासाठी या शब्दधनाचा विचार समाजशास्त्राचा, मानववंशशास्त्राचा आधार घेतल्याशिवाय अपूर्ण राहील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमाण भाषेचे क्षेत्र व्यापक करण्याचे फार मोठे काम विविध सामाजिक, प्रादेशिक बोलीभाषांनी केलेले आहे. इंद्रिय वाचक किंवा असभ्य शब्द म्हणून त्यांना पुन्हा गावकुसाबाहेर घालवून आपण आपल्या भाषेच्या समृद्धीला नख लावणार आहोत काय ?

दलित लोकवाङ्मयातून दलित बोलींचे लावण्यमयी शिल्प आपल्याला पाहायला मिळते. या बोलींमध्ये सहजता आणि स्वाभाविकता आहे. महार या महाराष्ट्राचा मूळचा रहिवाशी, महाराष्ट्र नाव त्यावरून पडल्याचे संशोधकाचे मत आहे. तसेच मराठी भाषेचा मूळ झरा म्हणजे 'महारी बोली' होय हे अनेक विद्वानांनी मान्य केले आहे.[३]

''हिंदू समाजाने आपला पाया तपासण्याची वेळ आली आहे.'' असे सांगणारा पुरुष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यांचा गौरव केला ते थोर विद्वान राजारामशास्त्री भागवत म्हणतात, ''महार हे आणि पुरातन कालचे अस्सल देशी लोक, या संबंधाने शंका नको. महार जसे कोकणात आहेत, तसेच देशावर आहेत. 'गाव तसे महारवाडा' आहे. महारांची बोली शुद्ध व असंकीर्ण देशी समाजावी. जे आमच्या भाषेचे रूप आजमितीस त्यांनी राखून ठेविले आहे, ते आमच्या भाषेचे आजमितीस शुद्ध रूप समजावे.''[४]

भागवतांनी महारामांगांच्या बोलींचा शब्दकोशही तयार केला होता. परंतु आजची तथाकथित विद्वान मंडळी मात्र दलितांच्या भाषेची 'धेडगुजरी' म्हणून संभावना करतात; तेव्हा आश्चर्य वाटते. मराठी भाषेचे मूळ सौंदर्य जर कायम टिकवायचे असेल तर दलित लोकवाङ्मयाच्या संशोधन, संकलन, संपादनाची आज नितांत गरज आहे.

सामाजिक दृष्टिकोनातून लोकबोलींचा, तिच्यातील शब्दांचा, शब्दबंधांचा, लोकोक्तीचा अभ्यास, करावयाचा असेल तर तिच्या विविध, सामाजिक बोलीभाषांचा साकल्याने विचार झाला पाहिजे. विशिष्ट बोलीभाषेला समाजापासून एकाकी पाडून व समाज व्यवहारापासून वेगळे करून तिचा अभ्यास खऱ्या अर्थाने होणार नाही. धुळे परिसरातील महार जातीची अहिराणी बोली-ध्वनी, शब्द, शब्दबंध, म्हणी, वाक्प्रयोग, लोकवाङ्मय या बाबतीत आपले ठळक 'वेगळेपण' जपून आहे. हा भेद किंवा वेगळेपण काळाच्या प्रवाहात नष्ट होण्याआधी त्याचा अभ्यास व संशोधन करून त्याला ग्रांथिक रूप प्राप्त करून देणे गरजेचे आहे.

संदर्भ

(१) सामाजिक अभिसरण व मराठी (लेख) - डॉ. गंगाधर पानतावणे
(२) भाषा आणि संस्कृती - ना. गो. कालेलकर
(३) दलित स्त्रियांची ओवीगीते (लेख) - प्रा. दामोदर मोरे
(४) राजाराम शास्त्री भागवत यांचे निवडक लेख - संपादक दुर्गा भागवत

मुलाखती

(१) किसन नथ्थु मोरे, गांव कापडणे, ता. जि. धुळे
(२) शंकर भिवा भामरे, गांव कापडणे, ता. जि. धुळे

: २ :
धुळे परिसरातील दलित स्त्रियांची : भिमओवीगीते

'ओवीगीते' हे लोकवाङ्मयाचे प्रभावी अंग असून ते त्या त्या प्रदेशातील विविध जाती-जमातींच्या स्त्रियांनी समृद्ध केलेले आहे. ओवीगीते म्हणजेच लोकगीते होत. लोकगीतांच्या निर्मितीत, जडण-घडणीत स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. सरोजिनी बाबर लोकगीतांची व्याख्या करतांना म्हणतात, ''विविध प्रकारांच्या जातीवंत स्वर विलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजेच लोकगीत होय.''[१]

लोकवाङ्मयाचा प्रभावी भाग म्हणजे लोकगीते होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकवाङ्मयाच्या संदर्भात म्हणाले होते की, ''लोकवाङ्मय ही आमच्या संस्कृतीची संपत्ती आहे व तिचे जतन व संवर्धन आम्हाला केले पाहिजे. त्यात आमचा पूर्वेतिहास सामावलेला आहे.''[२]

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरच लोकगीतांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषय झाले आहेत. कधी-कधी समाज एका विचारविश्वातून दुसऱ्या विचार विश्वात जातो. 'महार' समाजाच्या बाबतीत नेमके हेच घडले आहे. विचार परिवर्तन झाल्यामुळे समाजाच्या जीवनात बदल होतो. समाजाचय जीवनपद्धतीत आणि त्यांच्या मुळाशी असलेल्या जीवनदृष्टीत लक्षणीय बदल होतो.

महार जातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शुद्र पूर्वी कोण होते ?' किंवा 'अस्पृश्य मूळचे कोण ?' अशी पुस्तके लिहून इतिहास दिला. 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' यासारखी पुस्तके लिहून धर्म-संस्कृती दिली. त्यामुळे दलितांच्या जीवनदृष्टीत परिवर्तन झाले. शिक्षितांपासून अशिक्षितांपर्यंत सर्वांचे जीवन उजळून निघाले. धुळे परिसरातील ग्रामीण महार समाजातील स्त्रिया याला अपवाद कशा असतील ? त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या कार्यकर्तृत्वावर, विविध मानवमुक्तीच्या लढ्यांवर ओव्या रचल्या आहेत. त्या धुळे परिसरातील असल्या कारणाने अहिराणी बोलीभाषेतून त्यांची निर्मिती झाली आहे. एक दलित स्त्री म्हणते -

"भिम भिम करू, भिम केयीना वं मया,
भिमना मयामान मिये सग्यासले साया"

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान दलित स्त्रीला केळीच्या मळ्याप्रमाणे वाटते. केळीच्या मळ्यात जसा गारवा असतो तसा माझ्या भिमाच्या कार्यकर्तृत्वामुळे सर्व दीन दलित वंचितांना गारवा मिळत आहे. हा गारवा किंवा साया-सावली प्रतिकात्मक आहे. ही सावली शैक्षणिक आहे, सामाजिक आहे, राजकीय आहे, धार्मिक आहे. या सावलीच्या आश्रयाला जो कोणी येईल त्याचे कल्याण निश्चित आहे असा विश्वास या स्त्रीला वाटतो.

"भिम भिम करू, भिमनी फुलाई आमराई
भिमनी आमराईमा व्हयनी सग्यासनी कमाई"
"भिम भिम करू भिम सुग्रीनना खोपा
आते नही कायजी सग्या निचित झोपा"
"मन्हा भिमनी करा घटना लिखीसन कायदा
गोर-गरीब जनताले मियना जगाना वायदा"

उपरोक्त ओवीगीतांचा आशय बाबासाहेबांच्या प्रचंड सामाजिक कार्यामुळे आपल्या समाजाला काय काय लाभ झाला, याचे प्रकटन करतो. भिमाने घटनारूपी कायदा केल्यामुळे आता आपल्याला भयमुक्त जीवन जगता येईल. भिमाने केलेला कायदा म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय, याप्रमाणे जगण्याचा भरोसा आहे. वायदा आहे असा आशावाद या ओव्यांतून व्यक्त होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ या अशोक विजयादशमीच्या दिवशी महार समाजाला बौद्ध धम्माची दीक्षा दिली. सगळ्याच दलित जातींनी धर्मांतर करावे असे बाबासाहेबांना प्रामाणिकपणे वाटत होते; परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. परिणामी फक्त महार जातीतील स्त्री-पुरुषांनीच धर्मांतर चळवळीला प्रतिसाद दिला. धर्मांतरामुळे महार समाजाला बुद्धाचा जीवनमार्ग मिळाला. या संदर्भात दलित स्त्री म्हणते -

"भिम भिम करू भिमनी बांधा पिंप्पयना पार
पिप्पयनी सायामान जीव व्हयना गारेगार"

या ओवीतील 'पिप्पयना पार' म्हणजे पिंपळाच्या झाडाखाली नवीन ओटा बांधला. हा पिंपळाच्या झाडाखालील ओटा प्रतिकात्मक आहे. पिंपळाला बोधीवृक्ष म्हटले जाते. याच पिंपळाच्या झाडाखाली गौतम बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली होती. मधल्या काळात हा ओटा ओस पडला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्राचे पुन्हा प्रवर्तन केले व समस्त दीन दलित या पिंपळाच्या झाडाखाली आले. 'जीव गारे गार' होणे म्हणजे 'शांती' मिळणे होय. बाबासाहेबांनी महार समाजाला धम्मरूपी सावली दिली. त्यामुळे आमचा 'जीव' म्हणजेच 'मन' गार झाले, शांत झाले. 'मनाची शांती म्हणजेच धम्म होय' असे अलेक लक्ष्यार्थ प्रस्तुत ओवीतून सुचित होतात.

धर्मांतरामुळे आमच्या जीवनात काय बदल झाला हे अगदी सोप्या भाषेत एक स्त्री सांगून जाते ती म्हणते -

"भिम भिम करू भिमनी दावं पिप्पयनं झाड,
भिमनी पाजी खीर तोंड व्हई गयं गोड"

बुद्धाच्या धम्मामध्ये 'पिंपळाचे झाड', 'खीर' या गोष्टींना ऐतिहासिक संदर्भ आहेत. पौर्णिमेच्या दिवशी बुद्धाला पिंपळाच्या झाडाखाली ज्ञानप्राप्ती झाली होती. सुजाता नावाच्या स्त्रीने बुद्धाला 'खीर'

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिली होती. हीच खीर भिमाने आम्हाला पाजली. 'खीर पाजणे' म्हणजे धम्मज्ञानाची प्राप्ती करून देणे होय. हे सूचन वरील ओवीतून होते.

धर्मांतराच्या संदर्भात पुढील ओवीगीते उल्लेखनीय आहेत.

''भिम भिम करू, भिम कमयनं फूल
भिमनी दावा मार्ग बांधा बुद्धाना पूल''
''भिम भिम करू, भिम फणसना गरा
भिमनी दाया मार्ग, तोच आते खरा''
''भिमनी दिन्हा संदेश, प्रज्ञा-शील-करुणा
भिमनी वाणी ऐकी, चुकेल व्हयनात शाना''
''भिमनी सांगं माले, नको करू देव-देव
बुद्धाना धम्माशिवाय आपले नही दुसरं गाव''
''नको नको भाऊ सांगू, मंदिरमा जावाले
भिमनी बांध विहार, शांती मियनी जीवले''

प्रस्तुत ओवीगीतांचा मराठी अर्थ थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. भिम म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जणू कमळाचे फूल आहे. कमळाला बौद्ध धम्मामध्ये वेगळे महत्त्व आहे. हे याठिकाणी लक्षात यावे. बाबासाहेबांनी मानवी जीवनाचा प्रवास सुखकारक व्हावा म्हणून बुद्धाचा धम्मरूपी पूल बांधून दिला आहे. या पूलावरून भवसागर सहज पार करता येईल. असे सूचन प्रस्तुत ओवीतून होते. भिमाने दाखवलेला बुद्धाचा मार्ग हाच खरा जगण्याचा मार्ग आहे. म्हणून देव-देव करत फिरण्यापेक्षा प्रज्ञा-शील-करुणा या तत्त्वत्रयीला प्रमाण मानून जगा. 'नीती' हेच धम्माचे सार आहे. ईश्वरवादी होण्यापेक्षा 'नीतीवादी' बना अशा प्रकारचे संदेश बाबासाहेबांनी आपल्याला दिले आहेत. याचाच पुरस्कार जणू ही स्त्री प्रस्तुत ओव्यांतून करीत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या जीवनातील शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. त्यांनी समस्त दलित समाजाला 'शिका' हा मौलिक संदेश दिला. कारण 'शिक्षण म्हणजे जाणीव जागृती' अशी त्यांनी शिक्षणाची व्याख्या केली आहे. शिक्षणाशिवाय तुमच्या जीवनातील अज्ञानाचा अंधःकार दूर होणार नाही. म्हणून तुम्ही खूप शिका. असे ते वारंवार आपल्या अनुयायांना सांगत, नेमका हाच आशय पुढील ओवीगीतांमधून व्यक्त होतो.

''भिमनी सांगं आमले, तुम्हे मन लायी शिका
पैसाना करता कोणले, 'शील' नको विका''
''भिम भिम करू, भिम ग्यानना सागर
भिमना ग्यानना मांडा गावोगाव जागर''
''वदू नका मरेल ढोरे, द्या हाई काम सोडी
पोरे पोरी सायमां धाडा, लावा तुम्हे शिकानी गोडी''
''मन्हा बाबानी कयात, कायदा उलट-पालट
शिकनं महारनं लेकरू, चाले जसं डोलत''

शिक्षण हे सर्व समस्यांवरचा तरणोपाय आहे असे बाबासाहेबांनी आपल्या निरक्षर बांधवांना सांगितले. परंतु शिक्षणाबरोबर त्यांनी शीलाचेही महत्त्व जाणले होते. ते म्हणतात ''आपण शिकलो म्हणजे सर्व काही झाले असे नाही. शिक्षणाचे महत्त्व आहे यात शंका नाही. मात्र शिक्षणाबरोबर माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे.'' हा संदेश ''पैसाना करता कोणले 'शील' नको विका'' या ओवीतून अगदी सहज मिळतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कठोर परिश्रमाने जे ज्ञान प्राप्त केले त्या ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार दलित समाजामध्ये व्हावा असा आशावाद ''भिमना ग्यानना मांडा, गावोगाव जागर'' या ओवीतून व्यक्त होतो. जुन्या काळातली घाणेरडी कामे सोडा आणि आपल्या पोराबाळांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगा. शिक्षणामुळे संपूर्ण जीवनाचा कायापालट होतो. त्याचे बोलणे, वागणे, चालणे या सगळ्या गोष्टींमध्ये परिवर्तन येते. म्हणून ही स्त्री म्हणते ''शिकनं महारनं लेकरू चाले जसं डोलत....'' एवढा आत्मविश्वास शिक्षणामुळे निर्माण होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनपर्वामध्ये महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह या आंदोलनांना अनन्य साधारण महत्त्व आहे. या आंदोलनाचे पडसादही दलित स्त्रियांच्या अहिराणी ओवीगीतांत उमटलेले आढळतात. एक स्त्री म्हणते,

''भिम भिम करू, भिम पिना महाडनं पानी''
''भिमनं पानी पीसन, माले नवी सूद उनी''

चवदार तळ्याचा सत्याग्रह मानवतेचा लढा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होता. तो एक धर्मसंगर होता. ते पाणी प्यायल्याने दलित समाज अमर होणार होता, अशातला भाग नाही. हे पाणी पिणे प्रतिकात्मक होते. 'या पाण्यानेच माझ्यात पाणी आलं' असे एक दलित कवी सहज म्हणून जातो. बाबासाहेबांच्या प्रत्येक आंदोलनाच्या पाठीमागे मानवतावादाचे अधिष्ठान होते. आम्हीही माणसं आहोत. म्हणून आम्हाला माणसांचे सर्व हक्क अधिकार मिळाले पाहिजेत. अशी त्यांची भूमिका होती.

"बाबानी सत्याग्रह कया, कायाराम मंदिरमा"
"भिमनी हिम्मत देखी, राम लाजना मनमा"

डॉ. बाबासाहेबांचे विचार ऐकून नाशिकचा काळाराम मनोमन लाजला असेल अशी कल्पना ही स्त्री या ओवीगीतात करते. दर्शन घेणे व पवित्र होणे ही धार्मिक भावना ह्या चळवळीमागे मुळीच नव्हती. 'तुम्ही जर आम्हाला हिंदू मानत असाल तर हिंदूंच्या मंदिरात जाणे हा आमचा हक्कच आहे' असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हा मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह पाच-सहा वर्षे चालला परंतु काही उपयोग झाला नाही. तेव्हा बाबासाहेबांनी १९३५ साली येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली. तेव्हा ही घोषणा त्या दलित स्त्रीने ऐकली व म्हटले,

"कसाले लेऊ आते, राम तुनं नाव"
"भिम आमना देव, बुद्ध आमनं गाव"

आता आम्ही रामाचा नाद सोडला व बुद्धाला त्याच्या धम्माला अनुसरले असा भाव प्रस्तुत ओवीतून व्यक्त होतो.

डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व इतके प्रचंड होते की, त्यांच्या विषयी वर्णन करायला साहित्यातल्या सर्व उपमा-उत्प्रेक्षा अपुऱ्या पडाव्यात. भिमाला वेगवेगळ्या उपमा देऊन अलंकृत करण्याचा प्रयत्न दलित स्त्रीया आपल्या ओव्यांमधून करतांना आढळतात.

"भिम भिम करू, भिम कोहिनूर ना हिरा
भिमनी दिन्हं ग्यान, नही आटाव कधी झरा"
"भिम भिम करू, भिम गयामाना ताई
भिमनी लिखी घटना, माले कायदा व्हयना माहीत"
"भिम भिम करू, भिम मन्हं कानमानं सोनं
मन्हा सोनाले लागे ऊन कितलं झाकू मी पदरानं"
"भिम भिम करू, भिम मन्हा सोनाना ताट
आज भिमनी जयंती, सग्या गावमा साखर वाट"
"भिम भिम करू, भिम जसी सोनानी साकी
भिमनी चमक देखीसन दुस्मन गया फाकी"
"भिम भिम करू, भिम जसा पानना वं ईडा
भिमना रथ उना, अंगण मा वं मारा सडा"
"भिम भिम करू, भिम चांदीनं पदक
भिमना फोटो ओवाडाले घडं सोनानं तबक"

अशा प्रकारच्या ओवीगीतांमधून दलित स्त्रिया उपमा-उत्प्रेक्षांची उधळण करतात. शेवटी ही स्त्री म्हणते,

"राम राम ईसरा, आते करा 'जयभीम'
भिमनी कया चमत्कार, पलटी गयात आपला दिन"

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध सामाजिक आंदोलनांमुळे दलितांच्या जीवनात सूर्य उगवला. आंबेडकरपूर्व काळात विविध प्रकारच्या गुलामीचे, अपमानाचे, अन्यायाचे, अत्याचाराचे ओझे घेऊन दलित समाज जगत होता. परंतु डॉ. आंबेडकर नावाच्या प्रज्ञासूर्यामुळे गावकुसाबाहेरच्या वस्त्या प्रकाशमय झाल्या. म्हणून एक कवी म्हणतो,

"भिमा तुझ्या जन्मामुळे, उद्धरली कोटी कुळे"

संदर्भ

(१) मराठीतील स्त्रीधन - डॉ. सरोजिनी बाबर
(२) लोकसाहित्य संपदा - ना. रा. शेंडे

मुलाखती

(१) श्रीमती लक्ष्माबाई अर्जुन भामरे - गांव कापडणे, ता. जि. धुळे
(२) सौ. चंद्रकला बाबुराव गरूड - गांव रूनमळी, ता. साक्री, जि. धुळे
(३) सौ. ज्योती विनायक इंदिस - गांव शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे
(४) सौ. वंदना दिलीप शिंदे - गांव लामकाणी, ता. जि. धुळे

■ ■ ■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ सरोजा स्मरण-रेखा ॥

सुशील पगारिया

काही व्यक्तींचे मृत्यू, मनाला कायमच्या जखमा करून जातात. त्यांचा मृत्यू समोर दिसत असतो. परंतु तो आपणमात्र स्वीकारूच शकत नाही. अशा खोलवर, न भरून येणाऱ्या जखमा करून गेलेल्या तीन व्यक्ती ! एक काकाजी - माझे वडील, श्री. पु. भागवत आणि सरोजिनी वैद्य !

सरोजिनीबाईंचा आजार, पाय काढीत नव्हता. तरी आपण त्यांना आणि आपल्या मनाला मनाला वारंवार बजावून सांगत होतो, ''तुम्ही बऱ्या होणार आहात. नक्की !'' अगदी जोशी हॉस्पिटलमध्येही रुग्णशय्येवरून त्या आपल्याशी अगदी क्षीण स्वरात काही सांगू पहात होत्या, ते आपल्यापर्यंत पोचत नव्हते, अगदी पुनःपुन्हा सांगत होत्या. आपल्याला प्रयत्न करूनही ते समजत नव्हते. आपण, शेजारी असलेल्या सेविका आणि श्री. वैद्यांनाही ते 'समजते आहे का' हे विचारले, त्यांनाही आकलन होत नव्हते. मग आपण त्यांना सांगितले. ''तुम्ही बऱ्या व्हा. मग आपण बोलू ! मला आत्ता हे कळत नाही.''

फोनवरून जेव्हा विचारले तेव्हा ''त्या पुण्याला गेल्या आहेत'' असे श्री. शंकर वैद्यांनी सांगितले.

आपण पुण्याला जातच होतो. त्यांच्या मामांच्या घरी गेलो. मागच्या एकावेळी इथेच त्यांनी भेटायला बोलावले होते. मामांनी सरोजाताईंना जोशी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याचे सांगितले. पत्ता त्यांनाही नीटसा सांगता आला नाही. मग दोन जोशी हॉस्पिटल्स शोधली. तिसऱ्या, भांडारकर रोडच्या आतल्या बाजूस असलेल्या हॉस्पिटलमध्ये त्या सापडल्या. भेटीचा आनंद दोघींना किती झाला, किती बोललो आणि आत्ताच्या अस्वास्थ्याची हकिकत कशी सांगितली, आणि आता प्रकृती बरी आहे असा दिलासा दिल्याचे चित्र आजही डोळ्यासमोर दिसते आहे. आणि मग आपण दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी गेलो. आणि पाच-सहा वेळा अगतिकपणे जातच राहिलो. 'निरंजन' आला. वैद्य होतेच. आपला उमाळा आपण कसाबसा आवरीत होतो. पुण्याहून जळगावला आलो आणि दुःखद वार्तेचा स्वीकार करावाच लागला.

मुंबईत गेल्यावर एकदातरी सरोजाताईंना भेटायचेच असा अलिखित नियमच होता. मग कधी घरी, कधी त्यांच्या ऑफिसमध्ये, कधी मौजेत तर कधी त्या सांगतील त्या ठिकाणी !

कितीतरी बोलायचं असायचं-सांगायचं असायचं. त्यांच्या भोवती विद्वत्तेचे, संशोधकाचे वलय होतेच. पण आपण भेटतांना ते कधीच आड आले नाही. एक हितचिंतक, एक जिव्हाळी स्नेहबंध अतूट होता. मैत्रीचा पाया समानशीलतेच्या आधारावर असतो. पण आपल्यात असे कुठले समानत्व ? कुठली ओढ ? कुठले होते ना कळे ! किती अनंतवेळा भेटलो आपण ! तीच काळजी-कळकळ आणि ''बरं का'' म्हणून नव्या संभाषणाचा सतेज ओघ.

बोलताना किती आणि काय बोलत होतो ? त्यांच्या वडिलांच्या अखेरच्या वेळा, निरंजन मोठा होताना त्याचा बदललेला आवाज, बोलताना आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अडचणीत त्यांनी सुचवलेले उपाय. अगदी माझ्या नूतन सुनेला मी पुढे शिकण्याचा केलेला आग्रह ! आणि मग त्यांनी सुचवले की 'तिची इच्छा नसल्यास सोडून द्या आग्रह !' त्यांची माझी क्षेत्रे कितीतरी वेगळी ! भेटणारी माणसं वेगळी, परिसर वेगळा. पण आत्मीयतेचा धागा मात्र सुदृढ ! अगदी हीच आत्मीयता माझी मैत्रीण, प्रसिद्ध लेखिका सुमती देवस्थळेने अनुभवलेली. त्यांच्या अगदी आणिबाणीच्या चिंतेत, आम्ही दोघीही वेगवेगळे प्रयोग करीत होतो. वेडावून गेलो होतो आणि सरोजाताईंनी त्यांना इतक्या छान रीतीने समजावून सांगितले की त्यांचा ताण एकदम हलका झाला. अगदी सुटका झाल्यासारखा त्या मोकळ्या झाल्या.

हा आत्मीयगुण अतिशय दुर्लभतेने मिळतो. तो रक्ताच्या नात्यातसुद्धा लाभतोच असे नाही. पण हे सौहार्द, ही आत्मीयता, निखळ प्रेम करण्याची वृत्ती या गुणांनी सरोजाताई फार फार श्रीमंत होत्या.

सुमारे पंचवीस-सव्वीस वर्षांपूर्वी लेकीच्या वरसंशोधनात व्याकूळ झालेली मी; तेव्हा त्यांनी दिलेला आधार; तिच्या लग्नाच्या धावपळीत - माझ्या व्यग्रतेत मुद्दाम तासभर येऊन दिलासा देणाऱ्या; पगारिया गेल्यावर जळगावला मुद्दाम येऊन एक दिवस देणाऱ्या सरोजाताई, त्यांची वेळेची चाललेली कसरत, धावपळ मी नेहमीच पहात होते. आणि त्यातून त्यांनी दिलेला वेळ किती मोलाचा होता हे आजही जाणवते. काही विशिष्ट लेखना विषयी त्या मला सतत आग्रह करीत होत्या. पण त्यातल्या 'अडचणी' मी त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर, त्या त्यांना पटल्या. पण त्यांना हवा असलेला संदर्भ काही अंशी एका दीर्घ लेखनात उतरल्यावर त्या खुषालल्या. "कुठलाही अभिनिवेश न धारण करता तुमचे लिखाण सुरेख झाले आहे." हे पुनःपुन्हा सांगत राहिल्या. माहेरी भावांमध्ये मी एकटी बहीण, तशा त्याही. येणारे अनुभव, गमतीजमती सांगून आम्ही एकमेकींना रंजवित राहिलो.

पुण्याहून जळगावला त्यांना तशाच आजारी अवस्थेत सोडून निघावे लागत होते. त्यांच्या सेविकेशिवाय त्या वेळी त्यांच्या पाशी कोणी नव्हते. एका वेगळ्याच मनःस्थितीत तो निरोप घेतला होता; मी एक हात हातात घेतला, एक त्यांच्या भालावर ठेवला. आणि आठ-नऊ वेळा हलक्या आवाजात दीर्घ 'ॐ' घेतला. त्यांना मनात भरून घेत एका अलिप्तपणे त्यांचा निरोप घेतला !

त्या गेल्यावर त्यांची पत्रं शोधीत होते - एक पत्र हाती आले. पंधरा तीन चौऱ्याऐंशीचे लोकहितवादी मंडळातर्फे 'वैद्य' पतीपत्नींना तीन दिवस व्याख्यानासाठी जळगावला आमंत्रित केले होते. प्रथम सरोजाताई दोन दिवस माझ्याकडे थांबल्या. मागाहून शंकर वैद्य आले; मग दोघेही डाकबंगल्यात मुक्कामाला गेली. इथून गेल्यावरचे हे पत्र -

१५.३.८४
मुंबई-१९

प्रिय सुशीलाताई,

आमचा परतीचा प्रवास छान झाला. गाडी उशीरा पोहचली. पण वाटेत गप्पा चांगल्या झाल्या. आणि नंतरचे दुपारचे रेडिओ रेकॉर्डिंगही साधले !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकूण जळगावची फेरी मनात सांभाळून ठेवावी अशी छान झाली. खूप दिवस आपल्याला एकमेकींना निवांत भेटायचे होते ते थोडेतरी साधले म्हणून समाधान वाटते. आपल्या गप्पातून अगदी ओघाओघानेच आपण काही लिहिण्याच्या विषयांकडे वळलो हे ही 'फळ' महत्त्वाचे आहे. तुंम्ही त्याचा विसर पडू देऊ नका.

आता पुण्याहून येताजाता मुंबईला तुम्ही उतरणार आहातच. लेकीच्या आणि माझ्याही ओढीने असं समजते ! मी जरूर वाट पाहीन. तुमच्यासाठी काही छान पुस्तकं काढून ठेवली आहेत. तुमचे येणे लांबले तर पोष्टाने पाठवीन.

आपली फळांची खरेदी फार चांगली ठरली. अगदी मधुर खरबूजे, टरबूजे निघाली. मुंबईच्या बाजारात बरेचदा या बाबत फसवणूक झाल्याने ती विशेष अपूर्वाईने चाखली.

आलेल्या माणसांचा पाहुणचार कसा करावा, हे तुमच्या पासून शिकावे. सुगंधी उटण्याचा वास अजून मी घेतेच आहे.

तुमची व्रात्य, थट्टेखोर आक्रमक अपत्ये विशेष आवडली. त्यांच्याशी इतक्या मोकळेपणाने गप्पा झाल्या की जशी पूर्वीपासूनची आमची चांगली ओळखच आहे. येताना मात्र त्यांचा नीट निरोप घेतला नाही. आमची संभाषणे तुम्ही मजा पहात अनुभवत होता ना ?

आता घर झपाट्याने उभं राहील. तुमचं काम मुलं थोडं फार वाटून घेतील, आणि विश्रांतीही मिळेल.

आपण लवकरच भेटणार आहोत असं मनात वाटतं आहे. तेव्हा बाकी सर्व भेटीतच....

घाईघाईत लिहिलेल्या या पत्रानं माझंही समाधान झालेलं नाही. पण वेळेसाठी थांबेन तर एवढंही तुमच्यापर्यंत पोहोचणार नाही अशी भीती वाटते.

सांभाळून रहा.

तुमची
सरोजिनी

■■■

लेखकांसाठी सूचना

१. लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
२. लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
३. लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
४. लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतःजवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
५. लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.
६. लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
७. निर्णय कळविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.
८. नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ कुसुमाग्रजांची "लिलाव" एक चिंतन ॥

डॉ. केशव फाले

भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेतकरी हा या देशातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. उन, वारा, पाऊस झेलत शेतात राबणारा शेतकरी म्हणजे एका अर्थाने योद्धाच आहे. सैनिक रात्रंदिवस सीमेवर राहून आपले रक्षण करतात तर बळीराजा रात्रंदिवस काबाडकष्ट करून सर्वांच्या उदरभरणाची व्यवस्था करतो. परंतु साऱ्या जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा मात्र आज मरणाला जवळ करीत आहे.

शेकडो वर्षांपासून परिस्थितीशी दोन हात करीत हिंमतीने जगणारा शेतकरी आजच्या काळात आत्महत्या करतो आहे. शेतकरी-आत्महत्यांच्या आकडेवारीत विदर्भ आघाडीवर आहे. विदर्भात घडलेल्या व घडत असलेल्या आत्महत्यांच्या मागे 'कर्जबाजारीपणा' हे सार्वत्रिक कारण असल्याचे सत्य समोर आले आहे. आजवर भारतीय शेतकरी कर्जबाजारी नव्हता असे नाही. तो कर्ज घेत होता. फेडत होता. व्याजही भरत होता. परंतु अलीकडच्या काळात एकीकडे त्याची कर्ज फेडण्याची क्षमता नष्ट होत आहे, तर दुसरीकडे सावकारी पाश पूर्वीपेक्षा जास्त आवळले जात आहेत. खासगी सावकार व सहकारी बँका बळीराजाची इज्जत वेशीला टांगून त्याला क्षणोक्षणी अपमानीत करीत आहेत. बळीराजा आपल्या इभ्रतीला तळहातावरील फोडाप्रमाणे जपतो. जेव्हा त्याच्या इज्जतीचे धिंडवडे काढले जातात, तेव्हा हा मानसिक आघात तो नसेल सहन करू शकत ! हे अपमानीत जीणे व आत्मसन्मानाचा भंग त्याला आत्महत्येच्या त्याला आत्महत्येच्या मार्गावर घेऊन जात असावे.

भारतात लोकशाही आली. तिला सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करता आली नाही. या विषमतेचे सामाजिक परिणाम किती भयंकर होऊ शकतात याचा प्रत्यय वारंवार येत असतो. अपमानीत झालेल्या व्यक्तीच्या मानसिकतेचा विचार करता त्याची प्रतिक्रिया काय असेल ? अपमानीत झालेला माणूस एकतर सूड उगवेल किंवा स्वतःचे जीवन संपवेल. डॉ. रू. पां. पाजणकर यांच्या मते, **"अपमान, अपेक्षाभंग आणि आत्मप्रतिष्ठाभंग या तिन्ही व्यथांची, वेदनांची संकलित प्रतिक्रिया म्हणजे सूडभावना."**[1] विदर्भातील शेतकरी-आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर वरील विधानाचा विचार करता, मानहानीमुळे शेतकरी सूड उगवताना आढळत नाही. याचा अर्थ तो संवेदनाहीन किंवा स्वाभिमानशून्य आहे असा नाही. शेतकरी हा दाता आहे. 'देणे' हा त्याचा धर्म आहे. त्यामुळे सूड उगवणे त्याला माहीत नसावे. परंतु मानहानी झाल्याने कुठलीतरी प्रतिक्रिया घडणे स्वाभाविक आहे. येथेही ती घडते. या आंतरिक दु:खाचे पर्यवसान सूडाऐवजी आत्महत्येत होते. यासंदर्भात प्रा. सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' या कादंबरीच्या निमित्ताने मनोगतातून मांडलेले 'कटूसत्य' लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, **"...आत्मगौरव गमावलेला भूमीपुत्र काही अचानक आत्महत्या करीत नसतो.... कर्जाच्या**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओझ्याखाली चिंताग्रस्त होऊन दडपून चालताना आधी त्याच्या आत्म्याची हत्या केली जाते आणि सगळाच भोगवटा असह्य झाल्यावर दृश्य स्वरूपात तो देहहत्या करीत असतो.''[२] प्रा. देशमुखांचे चिंतन वस्तुस्थितीला धरून आहे, असे म्हणता येईल. कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होणे ही बाब निश्चितच शरमेची आहे.

विदर्भातील शेतकरी-आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर कुसुमाग्रजांच्या 'लिलाव' या कवितेने मला चिंतन करण्यास भाग पाडले. प्रस्तुत कविता स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिली असली तरी तिचे सामाजिक मूल्य आजच्या काळातही प्रेरणादायी ठरावे. ६०-७० वर्षांपूर्वीच्या कवितेत आजच्या शेतकऱ्यांच्या दूरावस्थेचे प्रतिबिंब तंतोतंत दिसावे ही कवीच्या प्रतिभेची किमया व त्यांच्या दूरदृष्टीचा परिणाम आहे.

सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडू न शकल्याने शेतकऱ्याचे सर्वस्वच कसे लिलावात काढले जाते याचे हृदयस्पर्शी चित्र कुसुमाग्रजांनी प्रस्तुत कवितेतून रेखाटले आहे.

''उभा दारी कर लावुनी कपाळा
दीन शेतकरी दावुनी उमाळा''

गरीब शेतकरी आपल्या घरासमोर हात लावून उभा आहे. सावकाराचा दूत लिलाव पुकारतो आहे. आपल्या घराचा लिलाव होतो आहे, या कल्पनेने त्याला उमाळा दाटून आला आहे.

''दूत दाराशी पुकारी लिलाव
शब्द कसले ते - घणाचेच घाव !''

लिलाव पुकारताना दूताच्या मुखातून निघत असलेले शब्द हे शब्द न वाटता आपल्या अंतःकरणावर कुणीतरी उद्दामपणे घाव घालीत असल्यासारखे त्याला वाटते. लिलावातील शब्द त्याच्या जिव्हारी लागतात. रक्ताचे पाणी करून मिळविलेले धान्यरूपी मोती क्षणार्धात लिलावात निघतात. घरातील बाजले, थाळी, गाडगी-मडकी इत्यादी वस्तूंवर झडप घालून त्या घराच्या बाहेर काढल्या जातात. या वस्तूंचे बाजारू मूल्य अत्यंत कमी असले तरी गरिबाचा संसार चालविण्यासाठी त्या मौल्यवान असतात. गरीब कुटुंबाची ती लाखमोलाची दौलतच असते. यावेळी शेतकऱ्याच्या पत्नीची अवस्थाही अत्यंत दयनीय आहे.

''स्तब्ध बाजूला बसे घरधनीण
लाल डोळ्यांतील आटले उधाण''

मीठ-मिरचीपासून तर गाडग्या-मडक्यापर्यंत संसारासाठी संचय केलेल्या वस्तू क्षणातच लिलावात निघाल्याने रडून-रडून शेतकऱ्याच्या पत्नीचे डोळे लालबुंद झाले आहेत. बराच वेळ रडल्यानंतर, प्रचंड दुःखावेगानंतर मानवी मनाची जी स्थिती होते, ती अवस्था कुसुमाग्रज 'लाल डोळ्यांतील आटले उधाण' या ओळीतून व्यक्त करतात. कर्जदार शेतकऱ्याची बायको तिच्या भुकेल्या लहान मुलाला पदर टाकून दूध पाजत असते. त्यावेळी माणुसकी व नैतिकता हरविलेला सावकार तिला न्याहाळत असतो.

''ऊर उघडे ते तिचे न्याहळोनी
थोर थैलितिल वाजवीत नाणी''

सावकाराला पैशाची गुर्मी चढलेली आहे. शेतकऱ्याच्या बायकोकडे पाहत त्याच्या जवळ असलेल्या थैलीतील पैशांचा तो खळखळाट करतो आहे. आणि त्या गुर्मीतच तो हीनपणाचे वर्तन करतो.

''आणि ही रे !'' पुसतसे सावकार,
उडे हास्याचा चहुकडे विखार !''

घरातील सर्व वस्तूंचा लिलाव करून झाल्याची खात्री केल्यावर ''आणि ही रे !'' असे उद्गार काढून सावकार आपल्या नीचपणाचे प्रदर्शन घडवितो. पैशाची गुर्मी चढलेल्या व माणुसकी हरविलेल्या सावकाराला घरातील वस्तूंसारखीच कर्जदाराची पत्नी ही सुद्धा एक वस्तूच वाटत असल्याने तो तिलाही लिलावात काढण्याची भाषा बोलून हास्याचा विषय बनवितो. त्याचे साथीदार त्याच्या नीचपणाला साथ देतात. अशा प्रसंगांना सामोरे जाताना कुठल्या माणसाचे काळीज घायाळ होणार नाही ? ही त्याच्या आत्मसन्मानाची, आत्मगौरवाचीच हत्या नाही काय ? असे प्रश्न मनात निर्माण करून कुसुमाग्रजांचे शब्द वाचकांचे अंतःकरण भेदून जातात.

भारतीय शेतकऱ्याच्या दूरवस्थेचे विदारक चित्र कुसुमाग्रजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात रेखाटले होते. बळीराजाच्या सर्वस्वाचा 'लिलाव' थांबला पाहिजे ही त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या चिंतनातून द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो. कारण काळ बदलला पण शोषितांचे

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लाचार जीणे व शोषकांची मानसिकता यात आजही काही बदल झालेला आढळत नाही. **''सामाजिकतेचं भान आणि तात्कालिकाच्या चिंतनाचा वेध घेण्याचं सामर्थ्य हे कवी कुसुमाग्रजाचे खास विशेष.''**[३] त्यांच्या 'लिलाव' या कवितेतूनही प्रत्ययास येतात.

कुसुमाग्रजांनी उपेक्षित व शोषित वर्गाविषयी अपार सहानुभूतीने लेखन केले आहे. या वर्गाच्या दु:खाचे मूळ आपल्या सामाजिक विषमतेत आहे याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे विषमता नष्ट व्हावी असे त्यांना मनापासून वाटत असावे. कारण त्यांच्या शब्दांना मानवतेचा गंध व करूणेचा ओलावा होता. आज अपमानीत झालेला शेतकरी अपमानाचा घोट गिळत आहे. परंतु भविष्यात याचे पडसाद उमटल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा तर कुसुमाग्रजांना द्यावयाचा नसेल ? त्यावेळी कुसुमाग्रजांचा हेतू काहीही असो, परंतु त्यांच्या इशाऱ्याला आजच्या काळात मोठा अर्थ प्राप्त झाला आहे एवढे मात्र खरे !

असंख्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या रूपाने आज उमटत असलेल्या तीव्र पडसादाची पाळेमुळे, वर्षानुवर्षांपासूनचा कर्जबाजारीपणा व बोचरा सावकारी पाश यात दडलेली आहेत असे म्हणता येईल.

सावकाराने मांडलेला लिलाव हा केवळ भौतिक वस्तूंचा लिलाव नसतो, तर शेतकऱ्याच्या मूलभूत हक्काचा व त्याच्या चारित्र्याचा 'लिलाव' मांडला जात असतो, ही बाब कुसुमाग्रजांना अधोरेखीत करायची होती. वाचकाचे लक्ष वेधून त्याआधारे त्याला अंतर्मुख करायचे होते आणि ते यशस्वी झाले आहेत. यासंदर्भात वि. स. खांडेकरांचा अभिप्राय उल्लेखनीय वाटतो. ते म्हणतात, **''ज्या समाजरचनेत गरिबाच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा लिलाव मांडला जातो, ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे. असा त्वेष वाचणाऱ्याच्या मनात उत्पन्न करण्याची शक्ती या कवितेत निःसंशय आहे.''**[४] कुसुमाग्रजांच्या शब्दांतून व्यक्त होणारी पीडितांविषयीची कणव ही त्यांच्या तीव्र सामाजिक जाणीवेतून व मानवतावादी विचारसरणीतून अवतरली आहे.

प्रस्तुत कवितेच्या रूपाने कुसुमाग्रजांनी आपले चिंतन मांडले. त्यातून मोठी शिकवण व गर्भीत इशारा दिला. असाच इशारा अलीकडच्या काळात शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांना शब्दरूप देणारे वऱ्हाडी कवी विठ्ठल वाघ यांनी आपल्या 'खापराचे दिवे' या कवितेतून दिला आहे.

''मंग सोंगेल फनाची अनी होते धारदार
कोनं सांगाव रगत तिले लागनार किती ?''[५]

त्यांच्या मते, पोटातली आग कधीतरी पेट घेणार आहे. क्रांतीच्या वणव्यात विषम व्यवस्था भस्म झाल्यावरच खापराच्या दिव्यातून वाती पेटतील.

शेतकऱ्यांना दु:खाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज आहे. या व्याधीवर तात्पुरती मलमपट्टी करून चालणार नाही. त्यावर शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नाही.

प्रस्तुत चिंतनाचे निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते की, शेतकऱ्यांची दैन्यावस्था संपवण्यासाठी वेगाने पाऊले उचलली गेली नाहीत तर आज आत्महत्या करणारा उद्या 'हत्या' करण्यास मागेपुढे पाहणार नाही. म्हणूनच 'बळीचे राज्य' येणे ही पुढची मोठी क्रांती रोखण्याचा उत्तम मार्ग होय. कृषीप्रधान भारत देशात 'शेतकरी सुखी तर देश सुखी' ही संकल्पना रूजून शेतकऱ्याला सन्मानाची व प्रतिष्ठेची वागणूक मिळेल तो भारतीय समाजव्यवस्थेसाठी 'सोनियाचा दिनू' ठरेल.

■ ■ ■

संदर्भ

१. पाजणकर रू. पा., 'गडकऱ्यांची नाटके चिंतन आणि आकलन', म.रा. साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८, पृ. ११७.

२. देशमुख सदानंद, 'बारोमास', (लेखकाचे मनोगत), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वि.आ. २००५

३. घवी रवींद्र, 'प्रदशिक्षणा', खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९१, पृ. १२

४. खांडेकर वि. स., प्रस्तावना, 'विशाखा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण २००१, पृ. ६१

५. वाघ विठ्ठल, 'काया मातीत मातीत', पूर्णा प्रकाशन, अकोला, १९८५, पृ. २४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ 'पाणीयावरी मकरी' राम शेवाळकर ॥

मधु जामकर

प्रिय राम शेवाळकर,

तुमचे 'पाणीयावरी मकरी' वाचले. रुढार्थाने ते आत्मकथन नाही. आचार्य विनोबांना अभिप्रेत असलेले ते आत्म्यांचे चरित्र नाही - आहे ती तुमच्या 'स्व'ची कथा. त्याचाही पल्ला 'आपणा मध्ये विश्व पाहुनी पूजितसे मी विश्वाला' एवढा व्यापक नाही. हा 'मी' चारचौघा माणसांसारखा आहे. साहजिकच त्याचा हा जीवनप्रवास त्याप्रमाणे झाला आहे. ही वाटचाल सामान्याकडून असामान्याकडे जाण्यात स्वत:ची सार्थकता मानते - ज्या ज्या वळणावर हा जीवनप्रवासी थांबतो, तिथे तो मागे पाहून पुढे जातो. आतापर्यंतच्या प्रवासात तुम्ही ज्या विविध क्षेत्रातील संस्कारांची शिदोरी जवळ बाळगली तिचा ठसा कायम दाखविण्याचा इथे सोस आहे. आपल्या या जीवनप्रवासात सुष्ट-दुष्ट बरे-वाईट दोन्ही प्रकारचे लोक तुम्हास मिळाले आहेत. "कांही आपल्या वागण्या-बोलण्याने आपल्याला विद्ध किंवा विकल करून जातात. आपण किती सोसले हे दाखविण्याच्या हौसेपोटी त्यांना शब्दांच्या मखरात बसवून त्यांचे आयुर्मान वाढविण्याची वृत्ती मला मानवत नाही." असे तुमचे या लिखाणाविषयी मत आहे. पुढे तुमचा विस्तार राहतो तो "त्यामुळेच यातनादायक, अन्यायकारक ठरलेल्या बाबी ज्या तुमच्या किंवा इतरांच्या मनाला काळवंडून टाकतील त्या सांगण्याचे मी सहेतुक टाळत आहे." आपल्या जीवनप्रवासाची एकदा ही भूमिका घेतली की प्रयोजन आणि परिणाम यांची चौकट ठरून जाते; आणि वाचकावर मूल्यमापनापेक्षा आस्वादप्रक्रियेची जबाबदारी येऊन पडते. अर्थात् यात कुठलाच पूर्वग्रहदूषितपणा नाही, हेही तितकेच खरे आहे - साहजिकच माझी एक वाचक म्हणून भूमिका; सारे पुस्तक वाचल्यानंतर समाधान मिळण्याजोगे काय आहे तेवढेच मांडावे; जाता जाता आपल्या संवेदनशील मनावर कमी अधिक प्रतिक्रिया काय झाल्या, त्यास अधोरेखित करावे; एवढीच आहे. हे पुस्तक वाचताना जिथे जिथे माझी भावसमाधी लागली, तिथे तिथे मी वस्तुनिष्ठ जागा राहिलो. या जागेपणात माझी जी आस्वादनाची पातळी राहिली, केवळ तिचाच आलेख मला दाखवायचा आहे - लेखकाप्रमाणेच या वाचकाची देखील ही सारवासारव की आवराआवर नाही.

हे लेखन कोणत्या वाङ्मय प्रकारात मोडते ? यात प्रवास किंवा प्रसंगवर्णन आहे, कथाकथन आहे, नाट्य आहे, काव्य आहे, चिंतनशीलता आहे, अभिजातता आहे, वस्तुनिष्ठता आहे, आत्मनिष्ठा आहे, वास्तवता-गूढताही आहे. कल्पकता, साधेपणा आणि लालित्यही आहे. जे प्रसंग आणि अनुभवलेखन झाले त्याची सुरुवात, मध्य आणि शेवट यातली जिज्ञासापूर्ती, सृजनशीलता या बाबी वाचकाच्या लक्षात येतात. एरवी साऱ्या रिपोर्टाईज वळणाचा बाज कंटाळवाणा राहूनही वरील बाबींमुळे त्यात विरंगुळा सापडून जातो. आपल्या बहिर्मुखतेकडून अंतर्मुखतेकडे जाण्याचा तुमचा ध्यास पाहून आपणही आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आस्वादाच्या पातळीवर चिंतनशील होतो. या साऱ्या लांबलचक जीवनप्रवासात तुम्ही जी एकूण ४१ प्रकरणे आणि ४ परिशिष्टे मांडली, ती तुमच्या अनुभवाचे ठसे वाचकावर परिणाम करून जातात. प्रत्येक प्रकरण हा एक जीवंत अनुभव होण्यापेक्षा, तो वाचनप्रक्रियेत वाचकाचा अविभाज्य घटक बनून जातो. एखाद्या नजरेत भरणाऱ्या पुष्पामालेत तिची फुले नजरेत भरावीत, मात्र त्या माळेची गुंफण घट्ट होण्याऐवजी विस्कळीत दिसावी, एकेका फुलात अंतर राहावे, ते एकातून दुसरे ओवले जाऊ नये, सुसंगतपणा बाजूला राहावा असे झाले आहे. पुन्हा ही फुले आकर्षक असण्यापेक्षा गंधवती झाल्याने त्याच्या परिमलात वाचक, बाकी सारे विसरून मोहित होतो. तुमच्या जीवनप्रवासातील हे प्रसंग मला विविध वळणे वाटतात. तुम्ही ज्या पाऊलवाटेने या वळणाकडे वळलात, त्यावरचा विसावा तुमच्या पूर्व संचितामुळे अधिक सुखद होतो. नव्हे तो नव्या वळणाकडे जाण्यासाठी उत्साहवर्धक होतो. या दृष्टीने तुमची कौटुंबिक प्रकरणे मला महत्त्वाची वाटतात. त्यातला रेखीवपणा आदरयुक्त मांगल्याने भरलेला आहे. आपल्या मातापित्याचे आणि आजीचे तुम्ही जे रसाळ वर्णन केले आहे, त्यात वाचकाला आत्मप्रत्यय येतो. 'संचित' या शब्दाने हे नाते तुमच्या पुढील आयुष्यात सांस्कृतिक बांधिलकीचे दालन आखून देते. मातृसुखाला तुम्ही अगदी लहानपणी मुकलात, म्हणूनच की काय मातृप्रेमाचा झरा तुम्हाला मानवी प्रवाहात, चराचरसृष्टीत पाहता आला. आजीचे प्रेम आणि कीर्तनकार किंवा वेदांतिक यापेक्षा सत्पुरुष म्हणूनच तुमच्या वडिलांचा, भाऊसाहेबांचा लौकिक होता - त्यांचे निष्कपट मन, साधुतुल्य आचरण, अनासक्तवृत्ती व निस्वार्थी स्वभाव हे सारे आज तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा जिवंत ठसा म्हणून वाचकावर प्रतिबिंबित व्हावा असे चित्रण झाले आहे. आजीला आपला नातू 'दुधावरची साय' वाटतो, हे लक्षात घेऊन या उभयताकडे पाहावे असा तुमचा लेखनप्रपंच आहे. तुमच्या वडिलांचे पूर्वसंचित तुमच्याठवर ठसा देऊन जाते पण तुमच्या मुलाचे (आशूचे) कर्तृत्व एका वेगळ्या वाटेने तुमच्यापेक्षा अधिक ठसठशीत दिसते. यापूर्वी या मुलाने 'अंतर्नाद'मध्ये आपल्या बापाचे व्यक्तिचित्र जे रेखाटले, त्यात केवळ दोन पिढ्यातील अंतर नसून दोन पिढ्यातील चढउताराचा सुंदर आलेख आहे. ज्या दोन हातांनी तुम्ही मुक्तपणे लक्ष्मी उधळली, तिला मुलाने आधार दिला; तर ज्या वाणीने तुम्हाला सरस्वती प्रसन्न झाली तिचा स्वभाव 'पितृदेवोभव' झाला - हे भाग्य एका वाचकाला हेवा करण्यासारखे वाटते.

तुम्हाला प्रतिभा आणि प्रज्ञा आईच्या गर्भातच प्राप्त झाली. बाहेर तिच्यावर संस्कार झाले एवढेच. या दृष्टीने अचलपूर, अमरावती आणि नागपूर येथील अक्षरओळख आणि शब्दार्थाची भेट ज्या ऊर्मीतून तुम्ही रेखाटली त्याची कृतज्ञता ''आमच्या आनंदात ज्यांच्या वृत्ती टवटवीत होतात व आमच्या दुःखाने जे कोमेजून जातात असे अनेक जिव्हाळे लाभणे हे खरोखरी आमचे भाग्यच म्हटले पाहिजे' (पृष्ठ १०५) तुम्ही या शब्दात व्यक्त केली आहे. याच वळणावर राम देशमुख, मधुकर केचे, सुरेश भट आणि टी. जी. देशमुख हे 'मैत्र जीवाचे' लाभल्याने लेखक, वक्ता, सार्वजनिक कार्यकर्ता यांची पायाभरणी तुम्ही करून घेतली. या साऱ्यांचा वाशिम, यवतमाळ, नांदेड आणि वणी येथील निर्वाहयात्रेची इमारत भक्कम करण्यासाठी फायदा झाला - त्यातही नांदेड येथील पीपल्स कॉलेजमध्ये तुम्हाला जगण्याचे प्रयोजन स्पष्ट करता आले, जिव्हायात्रेसाठी प्रस्थान ठेवता आले, विविध उपक्रमांच्या मांदियाळीत स्वतःला घट्ट बांधता आले. 'मांदियाळी' या शब्दांत तुम्ही अनेक भाववलये अर्थपूर्ण केली आहेत. या निर्वाहयात्रेत वाङ्मयलेखनाची गंगोत्री 'असोशी' या काव्यसंग्रहाने तुम्ही सिद्ध केली. त्यातली 'हो म्हटले तू आणि मिळाले' ही कविता सिद्धांत आणि प्रयोग या दोन्हीत अगदी पहिल्या क्रमांकावर उत्तीर्ण झाली. या परीक्षेतले सौ. विजयाबाई हे सुवर्णपदक आहे. नांदेड हा मराठवाड्याचा भाग आणि तुम्ही विदर्भाचे असे असले तरी 'शेवाळे' गावानी तुमची उभयतांतील सीमारेषा भावगर्भ केली. तिच्या स्पष्ट अशा पाऊलखुणा नांदेडमधल्या पीपल्स कॉलेजने अक्षर केल्या. इथे जे अध्ययन, अध्यापन किंवा वक्तृत्वदर्शन घडले, ते तुमच्या पुढील परिपक्व जगण्याचे, नवे हुरूप देणारे समृद्धसंपन्न दालन झाले. नांदेडने तुम्हाला अष्टपैलू

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केले, अधिक गर्दीप्रिय केले. एवढेच नव्हे, तर या शहराने तुमच्यावर जो ठसा उमटविला व तुम्ही या शहरावर जो ठसा उमटविला, त्यात एकाच नाण्याच्या दोन बाजू ठसठशीत करण्याचे आगळेवेगळे शुद्धीकरण आहे. इथे तुमच्या भावजीवनात नरहर कुरुंदकरांचा ओलावा येऊन तुम्ही सदैव evergreen राहिलात. त्यातली आर्द्रता नांदेड सोडून वणीकडे प्रयाण करतांना, ज्या मिठीत ओलेती झाली, ते चित्र नेहमीसाठी वाचकांना घायाळ करणारे आहे. या पार्श्वभूमीवर तुमच्या चित्रपटात तुम्हा उभयतांचे, एकमेकांचे मैत्र सांधणारे, चित्र पाहता आले असते तर, दुधात साखर पडली असती.

नांदेड मधील अध्यापनाचा कार्यभाग अधोरेखित करताना तुम्ही लिहिले आहे, ''वैचारिक पृथगात्मता जोपासण्याची प्रवृत्ती, स्वामीजींच्या संस्कारांमुळे सार्वजनिक जीवनाचे पाथेय मिळाले. याचेच पर्यावसान पुढे विनोबांच्या आचार्यकुलाचा जीवनव्रत म्हणून अंगिकार करण्यात झाले.'' (पृष्ठ १६३) वणीचे प्राचार्यपद हा तुमच्या जीवनातील स्वतःला पुन्हा पुन्हा अजमावून पाहण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. इथे प्राचार्यपदाचे स्वप्न साकारही झाले, भंगही पावले. त्यात एक संस्था आपल्या हाती असावी याचे समाधान आहे. त्या बरोबरच दोन तपानंतरही स्वतःला समाधानाचे सुद्धा मानकरी होता आले नाही याचे दुःख आहे. इथे प्राध्यापक पदाचे, प्राचार्याविषयीचे व एकूण महाविद्यालयीन शिक्षणाविषयीचे तुम्ही केलेले चिंतन नव्या पिढीसाठी आदर्शवत आहे. या लेखनात तुमचा रोख आहे तो ''शिक्षणक्षेत्रामध्येही ज्ञानोपासना, उद्बोधन संस्कार व विधायक प्रवृत्तीची जोपासना यापेक्षा उपजीविकावाद अधिक फोफावला आहे व त्याबद्दलच्या शाश्वतीची हमी मिळाल्यावर स्वकर्तव्या-बाबतची उदासीनता, हेळसांड, बेईमानी, अप्रामाणिकपणा बेपर्वाई व बेजबाबदारपणा या अपप्रवृत्तीचा जोर बळावत चालला आहे.'' (पृ. १७४) याचाच परिणाम म्हणून तुम्ही सुन्न मनाने अस्थानी शक्तिपात टाळण्यासाठी मुदतपूर्व सेवा निवृत्ती घेतली. हा त्याग तुम्ही शिक्षणातली खरी जीवनमूल्ये स्पष्ट करून शिक्कामोर्तब केला. ही मूल्ये सांभाळली, वर्धित केली व त्यापायी नव्याने त्यागही सिद्ध केला. मूल्ये जोपासणारे विविध उपक्रम राबविले, ग्रंथालयाची बांधणी केली, ग्रंथालय परिषद घेतली. इथे लोकनेते, विदर्भाचे शिल्पकार म्हणून बापू अणे यांच्या कर्तृत्वाला आणि नेतृत्वाला नवा आकार देण्याची घडपड केली. ते विदर्भ समितीतर्फे खासदारकी साठी उभे होते. काँग्रेसविरोधी होते तेव्हा प्रचारात प्रत्यक्ष पंतप्रधान नेहरू आले. मात्र निवडून आले ते बापू अणे. पं. नेहरू जे बोलले त्यात प्रचारकी भाषणाचा आदर्श होता. विरोधी उमेदवाराविषयी टीका किंवा एकही शब्द नव्हता - उमेदवाराला निवडून येण्यासाठी पूर्व पुण्याई व लोकादर असावा लागतो. हा सारा प्रसंग तुम्ही बोलका केला आहे. (पृ. १९०) तो मुळातून वाचण्यासारखा आहे.

बापू अणे यांच्याविषयी तुम्ही जो नितांत आदर व्यक्त केला आहे. ते सारे विवेचन अंतर्मुख करणारे झाले आहे. एकूण वणीतले तुमचे जीवन ''प्राप्तकाल हा विशाल भूधर / सुंदर लेणी तयात खोदा / निजनामे ना त्यावरती नोंदा'' यासारखे झाले. वणीने तुम्हाला घडविले, तुम्ही वणीला घडविले. मात्र शंकर रिंगोलेसारख्या विद्यार्थ्याची आत्महत्या देखील तितकीच सुन्न करणारी आहे. किंबहुना राबविलेल्या उपक्रमांची ती शोकांतिका म्हणावी लागेल. तुम्ही तिचे वर्णन एका वाक्यात ''अध्यापकीय आयुष्यातील कधीही पचवता न येणारा अक्षम्य पराभव'' असे केले आहे. या पार्श्वभूमीवर तुमचे आचार्य कुळात पदार्पण म्हणजे पुनर्जन्म होणे झाले आहे. विनोबा हे तुमच्या 'जीवनाचे जीवन' झाले. त्यांचे शिक्षणविषयक चिंतन, तुमची सक्रिय भावपूजा झाली. विनोबांचा शिक्षणक्षेत्रातला प्रत्येक शब्द तुमचा मंत्र झाला. आता तुम्ही शिक्षक नव्हता, प्राध्यापक किंवा प्राचार्य नव्हता तर आचार्यपदाचे उद्गाते होता - आचार्य बनू इच्छिणारा शिक्षक हा ज्ञाननिष्ठ, समाजनिष्ठ व विद्यार्थीनिष्ठ असला पाहिजे, हे इथल्या त्याच्या अध्यापनाचे सूत्र झाले. तुमचे इथले शैक्षणिक मूल्याचे प्रयोजन व चिंतन मुळातून वाचण्यासारखे आहे (पृ. २०४) 'महाराष्ट्रातले आचार्यकुलाचे पहिले संकल्पपत्र माझ्याकडून भरले गेल्यामुळे आचार्यकुलाचा राज्यातला पहिला सभासद होण्याचे भाग्य मला लाभले'' असा स्वतःविषयीचा सार्थ अभिमान

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नोंदविताना तुमचा ऊर भरून आलेला चेहरा डोळ्यासमोर दिसतो. विनोबा 'कुल' हा शब्दप्रयोग करतात. संघ, मंडळ किंवा संस्था नव्हे. या शब्दामागे परंपरेचे पूर्वसंचित व नवतेचे नवे ध्येयधोरण आहे. शिवाय त्यातला निःशुल्क आत्मभाव नवा वारसा देऊन जातो. तुमच्या या प्रकरणातला शब्द न् शब्द चिंतनीय झाला आहे. शिक्षक हा राजकारणापासून अतीत असावा याचे स्पष्टीकरण तुम्ही ज्या पद्धतीने केले आहे. त्याला वाचकाच्या लेखी तोड नाही. तुमच्या आजवरच्या जीवन-प्रवासातील हे वळण मध्यवर्ती असून मागच्या-पुढच्या क्षितिजांना ते जोडणारे व समांतर झाले आहे. इथेच तुमची मामा क्षीरसागरांशी भेट झाली व तुमचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. आचार्यकुळातील शिक्षणक्षेत्र आणि आजचे शिक्षणक्षेत्र यांची तुलना करण्याचा मोहही तुम्हाला आवरता आला नाही. तो मार्मिक पद्धतीने संस्कृत सुभाषितातून व्यक्त केला.

"अन्य क्षेत्रे कृतं पापं तीर्थक्षेत्रे विनश्यति,
तीर्थक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपोभविष्यति"

(पृ. २१४)

आचार्यकुलाच्या वतीने गुजराथ सफर, एक शैक्षणिक सहल तुम्ही केली. ते प्रवासवर्णन नव्याने अर्थवाही झाले आहे. शैक्षणिक संस्था या राजकीय नेत्यापासून दूर असल्या पाहिजेत. वर्तमानकाळातील शैक्षणिक संस्था पाहता तुम्ही मंत्री मुरारजीभाईंचा दिलेला सल्ला "संस्था जर नीट चालायची असेल तर मलाच काय पण राजकारणातल्या कोणत्याही माणसाला कार्यकारणीवर घेऊ नका." (पृ. २२१) शिक्षणसम्राटांनी आचरणात आणला पाहिजे याकडे वेधले आहे. गुजराथ संघर्षाचा तुम्ही काढलेला निष्कर्ष देखील बोलका झाला आहे. त्याचे सार असे. "राष्ट्रीय दायित्व व ध्येयवेडे न विझलेल्या शिक्षणसंस्था पाहण्याचा तर या यात्रेचा उद्देश होताच पण शिक्षणक्षेत्रातील न विझलेले मूलगामी प्रयोग पाहून त्यातून आपल्या संस्थासाठी वा क्षेत्रासाठी आपल्याला काही घेता येते का तेही शोधण्याचा उद्देश होता." (पृ. २२२)

तुमच्या जीवनप्रवासातील जिव्हायात्रा ही विनोदी शैलीचा उत्कृष्ट दाखला आहे. बहिःशाल व्याख्यानमालेतून तुमच्यातला वक्ता जागा झाला. ग्रामीण पातळीवरील तुम्ही केलेले उद्‌बोधन श्रोत्यांना नव्याने घडले. उभा महाराष्ट्र तुमच्या या जिव्हायात्रेने पिंजलेला आहे. तुम्ही जे श्रोते जोडले ते तुमचे सखेसोयरे झाले. खानदेशातला जळगांव मुक्कामी अनवाणी पायाने, नंतर अजोड पादत्राणाने जो तुम्ही प्रवास केला त्याचे वर्णन वाचकांना हसवते, विचारी बनविते व शेवटी तुमच्याविषयी आदरभाव निर्माण करते. तुम्ही व्याख्यानांचा कधी व्यवसाय केला नाही. त्यात तुकारामाची 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे'ची आच होती. तिथे कुठे त्याच धंद्याची चौकट नव्हती. नियम नव्हते. जाहीरनामा नव्हता, अटीतटीचा बांध नव्हता की कुणाची शिष्टाई नव्हती. तुम्ही यावे बोलावे, आम्ही ते ऐकावे, त्यातल्या चित्तथरारक अनुभवाने चिंब भिजावे. हा जिव्हायात्रेचा तुमचा 'आत्मशोध' होता, व आमचा प्राक्तनयोग होता. याविषयी पूर्वी तुम्ही 'ललित'च्या एका अंकात फारच सुंदर विवेचन केले आहे. या साऱ्या यात्रेचा एकूण साज ज्ञानेश्वरांच्या 'वाग्यज्ञा'पासून सुरू होतो आणि 'जे दिव्य दाहक म्हणून असायचे' या पदावर स्थिरावतो. विदर्भ संघाने 'वक्ता तो दशसहस्रेषु' या ग्रंथात तुम्हाला अक्षय केले आहे. तुम्ही भरतवाक्य म्हणून "प्रतिभावंत व सहृदय यांच्यातील सेतूबंधन आपल्याला साधले, या कृतकृत्याची कमाई आयुष्यभर पुरायला हरकत नाही." (पृ. २३३) अशा वाक्याचा थाट मांडला आहे.

शेवाळकर, तुम्ही प्रकृतीने आणि संस्कृतीनेही कवीच आहात, कवीच राहणार. त्यामुळे शब्दांशी सलगी करताना तुमची कविता धो-धो वाहते. याचीच खूण म्हणून केवळ 'असोशी, रेघा आणि अंगारा' या काव्यसंग्रहाचे तुम्ही विवेचन करता. तुमची पुस्तकांची एकजात शीर्षके कवीप्रकृतीची दाखले आहेत. तुकारामाचा 'शब्दच आमच्या जीवाचे जीवन" हा शब्द परवलीचा झाला आहे. लक्ष्मी आणि सरस्वती यातला झगडा तुमच्या घरी तुमचे कविता झालेले शब्द सोडवितात. तुम्ही स्वतःच या शब्दांना स्वतःचा सूर देता. शब्द सूरांचे साम्राज्य जेव्हा प्रतिभावंताच्या अंगणात क्रीडा करू लागते, तेव्हा काही वेळा सूरांची मोहिनी नकळत तुमच्या गळी उतरते. ती गाऊ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागते. ''शब्द घाव घालतात, स्वर लळा लावतात. शब्द लक्षात राहतात किंवा विसरले जातात, स्वर चित्तात भिजून जातात. शब्दांना अर्थाची अट असते. स्वरांचे भावाशी सख्य असते. शब्द एखाद्याचे कान पकडतात, स्वर हे गळामिठी मारतात. शब्दांचे सार्थक होण्यासाठी बुद्धीची गरज लागते. स्वरांची मोहिनी मनुष्येतर प्राणी सृष्टीवरही पडते. शब्द लिपीबद्ध झाले की त्याचे आयुर्मान वाढते, स्वर हवेत उडून जातात. त्याची उन्मादक स्मृती तेवढी मनामध्ये दीर्घकाळ रुणझुणत राहते.'' (पृ. २३९) आपल्या वंशाला पहिला दंश शब्दाने केला. त्याच्या नादापायीच स्वरांचे चांदणे अवसेलाही पौर्णिमा म्हणू, गाऊ लागले. मंगेशकर घराणे आणि शेवाळकर घराणे यांच्या सीमेवर जे शब्द-स्वरांचे शिवालय उभे आहे तेच मुळी 'इयेहृदयीचे तियेहृदयी घातले' या मगरमिठीचे द्योतक झाले आहे. या अंगाने आत्मशोधासाठी 'शब्दांशी सलगी केली' हे प्रकरण वाचावे व स्वतःच्या वाचनप्रक्रियेचे सार्थक करून घ्यावे.

तुम्ही, स्वच्छ मनाने झालेले लेखन, केलेले वक्तृत्व व घडलेले कार्य यात अजूनही समाधान नाही अशी कबुली दिली आहे. इथेच तुमच्या प्रतिभेचा, प्रज्ञेचा कस लागलेला आहे. केशवसुतांना आपले 'हरपलेले श्रेय' सापडत नव्हते. त्यापायी त्यांनी जीव पाखडला. म्हणूनच त्यांच्या प्रतिभेचे धुमारे आजही ताजेतवाने दिसतात. स्वतःकडे पाहण्यात ऐन रणांगणावर विस्मृती झालेला कर्ण पाहणे, किंवा आनंद-भैरवी गाणाऱ्या बोरकरांची आठवण होणे, हा निराशेचा सुस्कारा नसून पुढच्या वाटचालीकडे नव्या आशेने नेत्रदीपक झालेला, प्रतिभावंताचा अतृप्तीकडून तृप्तीकडे जाणारा मार्ग आहे. यातून तुम्ही काढलेला परंतु वाचकांना न पटणारा व एकूण तुमच्या वाटचालीशी तुसडेपणा दाखविणारा सूर मी ''प्रत्येक झाडाच्या मोहराचा व बहराचा एक काळ असतो. तो संपलेला आहे. असे आत्मसमाधान मिळण्याच्या मनःस्थितीत मी आहे. त्यामुळे समोरून वाहून आलेले पुराचे फेसाळ पाणी काठावरून स्थिर दृष्टीने, शांतपणे पाहण्याची सूज्ञ भूमिका बजावणे आता प्राप्त आहे.'' या शब्दात मांडतो तसा दुर्लक्षित करतो. वस्तुतः प्रतिभावंताच्या जीवनात ही पोकळी येतेच. ती पुन्हा तो भरून काढतो. कवीवर्य बी आणि कवीवर्य तांबे यांचे 'मावळतीचे रंग' हे 'उगवतीच्या रंगा'पेक्षा अधिक क्षितिजावर खुलणारे होते. 'पाण्यावरील मकरी' पाहतांना किनाऱ्यावरची अवस्था 'मौनाचेही मौनकरी' अशीच असते. सारे आर्ष वाङ्मय आणि संतवाणी हीच ज्याची जीवनभाषा होऊन जाते त्यांचावरील निराशेचा विचार हा पुन्हा संताच्याच वाटेने विनम्र झालेला असतो. अशावेळी हे जीवनचित्रण संपावे तोच 'श्रीवत्स प्रकाशना'ची चाहूल लागते व ती देखील नाना करंदीकरांचा जीव घेणाऱ्या कहाणीतून. श्री. नाना करंदीकर यांची वाटचाल संशोधनाच्या विद्यापीठीय प्रदूषणाकडे वाचकांना खेचते तर त्यात लेखक-प्रकाशकाचे भाव अभिसरणाचे प्रत्यंतर आणून देते.

मुळात तुमचे घराणे वेदांताचे व अध्यात्ममार्गी असल्यामुळे वेद, उपनिषदे, दर्शने व रामायण-महाभारतादी ग्रंथ वाचण्याची आवड तुम्हाला रक्तातून आली. तुमचा स्वतःचा वैयक्तिक ग्रंथ संग्रह तुमच्या भव्य-दिव्य वास्तूमध्येही केवळ वस्तुशोभा म्हणून राहिला नाही, तर तो 'स्टोअर रूम'च्या ऐवजी 'पॉवररूम' झाला आहे. त्यात अभ्यास व वाचण्यात कुरुंदकरांमुळे लागलेली शिस्त आणि विनोबांचे चिंतन तुमच्या मर्मस्थानी अढळ झाले. तुम्ही दिलेले वाचनसंदर्भातील विनोबांचे बोल प्रत्येक वाचकाने हृदयावर कोरून ठेवावे, असे झाले आहेत. त्याचा पुनः प्रत्यय मी करून देतो. ''माणूस फक्त दोनदा जेवतो पण त्याची पचनाची क्रिया चोवीस तास चालू असते तसे माणसाने नित नेमके पौष्टिक तेवढेच वाचावे. त्याचे मनन बाकी निरंतर चालू ठेवावे.'' असे सांगून, विनोबा पुढे रोगी व त्याच्या उशाशी असलेल्या औषधाच्या बाटल्यांवरून रोग्याची चिंता व्यक्त करून आपला वाचण्यातला दाखला पूर्ण करतात.'' (पृ. २६२) मला हे सारे अंतर्मुख करणारे तर वाटतेच पण ते तुमच्या प्रकृतीशी अधिक जुळते झाले याचा प्रत्यय येतो. पुढे कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने पण मनापासून केलेल्या सर्जनशील सेवेचा आलेख तुम्ही विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष म्हणून केलेल्या कारकीर्दीचा देतात. तुमच्यामुळे विदर्भ साहित्य संघ विदर्भभर विस्तारला. त्यातली संमेलने, शाखा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विस्तार, युगवाणीचा उद्धार त्याबाबतचे वैचारिक नियतकालिकाचे चर्चासत्र, कर्तबगार नागरिकांचा सत्कार हे सारे उपक्रम 'योजकः तत्रदुर्लभः' या न्यायाने तुम्ही आपल्या नांवे चिरस्मरणीय केले आहे. संघाच्या इतिहासात हे कार्य वगळणे शक्य नाही. तसेच सुई आणि कात्री या न्यायाने तुम्ही सेन्सॉर बोर्डाकडे विधायक पद्धतीने पाहिले केवळ सभासद म्हणून हौस भागविली नाही. आणिबाणीत आपल्या मनाला सत्य असत्याची ग्वाही दिली. यावेळी तुम्ही राष्ट्रपतींच्या नांवे केलेले निवेदन एक धाडसी पाऊल म्हणून विचार करण्यासारखे आहे. तसेच बाळासाहेबांच्या टीकेला एका संमेलनाचा माजी अध्यक्ष म्हणून जे उत्तर तुम्ही दिले, सांघिक झुंज केली, हे सारे वाङ्मय संस्कृतीत वाखाणण्याजोगे झाले आहे. हा सारा संघर्ष तुम्हाला कृतार्थतेची पावती देतो आणि लगेच तुमची पुढची वाटचाल 'धन्यो गृहस्थाश्रम'कडे वळते. हा गृहस्थाश्रम चारचौघांसारखा आहे. पण त्यात पत्नीचा मानबिंदू दिसतो. तिचा तुमच्या घरात प्रवेश, पुढे तिचे अढळ स्थान, तिने विविध नात्यांशी केलेली सांधेजोड आणि आपल्या चाळीत, पदरात मोजलेले उन्हाळे-पावसाळे हे सारे सामान्यातून असामान्याकडे झुकणारे झाले आहे. एकीकडे 'ढळला रे, ढळला रे दिन सखया' असे आठवून पतीपत्नीच्या ऐक्याचा जो पाढा तुम्ही वाचकांपुढे ठेवला, त्याची मला पुनरावृत्ती कराविशी वाटते. ''या वयात नव्हाळीचे उमाळे उरलेले नसतात. परस्परांबद्दलचे आकर्षणही ओसरलेले असते. ओढ बाकी कायम असते. परस्पर स्पर्शाची ही गरज न पडणारी गाढ स्निग्धता उभय अंतःकरणात ओथंबलेली असते. परस्परांच्या स्पर्शनिरपेक्ष निःशब्द सान्निध्यात सुद्धा अनिर्वचनीय सुख लाभत असते. आपल्या आवडत्या अस्तित्वाच्या नुसत्या आश्वासनातही पुरेसे समाधान मिळत असते. दिवसोगणती भेटी न झाल्यातरी ते अदृश्य अस्तित्व आजूबाजूला कुठेतरी नांदते आहे या केवळ जाणिवेने धीर मिळत असतो.'' (पृष्ठ २९६) उतारवयातील ही संसारशैली मला अप्रूप वाटते. ज्या वाचकांच्या भाग्यात हे सुख आलेले असेल तो भाग्यवान ठरेल. मात्र ते वाचून अवगत होणारे नाही. त्याला आवडीने 'बहुत सुकृताची जोडी' मिळाली पाहिजे. एखाद्या झाडावर फुलाचे पाहता पाहता फळ व्हावे, ते नजर लागू नये म्हणून पानाआड दडावे. तिथेच ते पक्व व्हावे. त्याला राघू-मैना जोडीने संपूर्ण चाखावे व उरलेला शेष खाली पडताना धन्य व्हावा. या वळणाने तुमचा गृहस्थाश्रम किनाऱ्यावर पोचतो आहे. ईश्वरकृपेने त्याला कोणाचीच दृष्ट न लागावी. तुम्ही स्वतःच यासाठी विधात्याला साकडे घातले आहे. त्यातले निसर्गरम्य काव्य विस्तारभय लक्षात घेऊनही सांगतोच. ''आकाशात काळेकुट्ट व अवाढव्य ढग येतात. सगळे आकाश कोंदून टाकतात. प्रकाशाची नाकेबंदी करतात. विश्वाचा थरकाप करणारा गडगडाटही करतात. विजेचे आसूड सुद्धा ओढतात. सगळे वातावरण काही काळ कुंद व गुदमरून टाकणारे होऊन जाते. पण सुदैवाने मूळ सृष्टीची ही नित्याची प्रकृती नाही.'' (पृ. २९९) इथे अभिनवगुप्ताची अपूर्व निर्मितीक्षम प्रतिभा आणि महारसाचे त्याचेच विवेचन एकाचवेळी आपण अनुभवतो. हा एक शहाणपणाचा आस्वाद आहे.

तुमचे मैत्र 'कृष्णवचनांचा आरसा' म्हणून लौकिक पावते तर तुम्हाला भाग्यवान म्हणून लाभलेले विनोबा आणि आनंदवनातील बाबा आमटे यांना तुम्ही Great men are great in everything म्हणून उल्लेखले आहे. या आनंदवनात जो कर्मयोग सजला त्याला भक्तीचे व ज्ञानाचे आणि सेवेचे पाणी मिळाले. त्यात साधनाताईंनी 'हिमालयाची सावली' होऊन संगोपन केले. या साऱ्यांचे तुम्ही वेळोवेळी साक्षीदार होता हे वेगळे सांगणे नको. आयुष्यात जे किडके शरीर विधात्याने तुम्हाला दिले, त्यात विविध रोगांचे माहेरपण असणे गैर काय ? त्यातही लीलावतीतला अघोरी शस्त्रक्रियेचा आजारही तुम्ही 'स्वास्थ्याची आर्जवे' म्हणून जतन केला हे विशेष. या प्रसंगातली भावना निरपेक्ष कथनशैली वाचकांना जिज्ञासातृप्तीचा आनंद देते आणि त्यातला खिडकीबाहेर निसर्गाशी तादात्म्य पावणारा रोगी वाचकांच्या काळजात रुजून बसतो. नानाजी देशमुखांचा प्रकल्प जो 'चित्रकूटाचा रामदर्शन' म्हणून ओळखला जातो तो 'रामा'च्याच डोळ्यानी पाहावा, हाताने लिहावा व कानांनी ऐकावा. त्याला जॉर्ज फर्नांडिसांनी जी उत्तमतेची पावती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

दिली ती महत्त्वाची आहे. इस्लामी राजवटीत मंत्रीसुद्धा श्रद्धास्थानाची शासकीय देखभाल करताना मानत नाही. त्याला आपल्या प्रजेची श्रद्धास्थाने म्हणून मूल्य दिले जाते याचे वाचकाला अप्रूप वाटते. पंतप्रधान आजारी असताना 'प्रतिभावंत अटलजी' होऊन रसज्ञ भावनेने तिथे दीर्घकाळ रमतात हेही नसे थोडके ! तुमचा या बाबतचा शेरा "रामदर्शन प्रकल्प हा केवळ हिंदूनी श्रद्धेने पाहण्याचा विषय नसून आपल्या इतिहासाचे मर्म व संस्कृतीचे हृदय समजून घेण्याचा एक प्रभावशाली अनुभव आहे." (पृष्ठ ३६०) या शब्दात आमच्या मनोमनी ठसतो.

मंगेशकर कुटुंबाशी सलगी तुम्ही 'स्वरांचे सान्निध्य' म्हणून केली. यापूर्वी तुम्ही स्वरांकडे ओढले गेला होताच त्याचीच ही परिणती मानता येईल. यात 'अमृताचा घनु' हा हृदयनाथाचा संगीत कार्यक्रम हा तुमचा प्रारंभ बिंदू तर अमृतमहोत्सवी सत्कार समारंभात लताबाईंनी 'मोगरा फुलला' गाऊन तो उत्कर्षाप्रत नेणे हा उत्कट बिंदू मानता येईल. हे दोन बिंदू राम शेवाळकर तितक्याच नाजुक धाग्याने जोडतात, आपलेसे करतात ज्यायोगे वाचक, श्रोते स्वतःला धन्य होऊन पाहतात. या साऱ्यातले नाट्य कल्पना, भावना आणि विचार या तीन वळणाने रसपरिपोषासाठी अधिक अनुकूल झाले आहे. ते पुन्हा पुन्हा वाचावे, ऐकावे व समधात व्हावे. अशावेळी तुम्हाला "द्वेष ही मनाची अटळ मर्यादा आहे तर प्रेमाचा असा हा कडेलोट मनुष्य स्वभावाच्या औदार्याचा निदर्शक आहे. चांगल्या हेतूला व चांगल्या कार्याला ईश्वरभक्तीकडून कधी ना कधी न्याय मिळतोच." (पृष्ठ ३८४) या वळणाने अतृप्तीतले तृप्तीचे श्रेय मिळते. यामुळेच की काय संध्याछाया तुम्हाला सुखापर्यंत पोचवितात. हे सुख सांताकडून अनंताकडे झेप घेण्यास नवे पंख देणारे झाले आहे. त्याचे श्रेय तुमच्या व्यक्तिमत्त्वातील काव्य-शास्त्र-विनोद-वक्तृत्व या जीवनशैलीला आहे. मात्र कवीवर्य तांबे यांनी भीतीच्या वळणातूनही भरलेले 'तृप्तीचे द्रोण' रसिकांना बहाल केले. अशावेळी माझ्या सारखा वाचक तुमच्याकडे डोळे लावून बसतो. तुमच्या केकावलीची वाट पाहतो. अशावेळी "मनाला कृतकृत्यता देणारी ऐहिक वाङ्मयकृती वा सांस्कृतिक कर्तृत्व आपल्या नावे जमा नाही याची खंत वाढत्या प्रतिष्ठेला व कीर्तीला सदैव कुरतडत असते." (पृ. ३८८) याचाच विस्तारित भाग "अपेक्षित व अनपेक्षित ते मिळणे असा ज्याचा आयुष्याचा योग आहे त्याला सर्वोत्कृष्ट होता येऊ नये हा स्वप्न दारिद्याचा भोग म्हणावा लागेल." (पृ. ३८९) या प्रांजळ कबुलीत कसलेच ढोंग दिसत नाही. नितळ मनाचे ते बोल आहेत. पण ते तुमच्या प्रकृतीला धोका देऊन वाचकाची प्रतारणा करतात. जीवनाकडे सिंहावलोकन करताना ज्या खाचखळग्यातून तुम्ही प्रवास केला तो मचूळ चवीचा नव्हता - त्यात आत्मयोग नसेल, पण फळधारणा निश्चित आहे. जी कहाणी वाचक अथपासून इतिपर्यंत सरळ वाचतो तो मध्ये आडखळला तरी पुन्हा तुमच्या आत्मीयतेला वळसा देत नव्याने जागा होतो. हे वाचणे करमणुकीचे नसते त्यात 'स्व'चे विस्तारणे असते. तुमच्याशी लागेबांधे जोडणे असते. म्हणूनच "जन्मभर जगाशी बोलण्याची ओढ लागली आहे." (पृष्ठ ३९२) असे तुम्हास वाटते. हा सुखद अनुभव 'पाणीयावरी मकरी' या तुमच्या जीवनप्रवासात प्राप्त होतो. निरोपतीर्थावर जे तुम्ही स्वैर चिंतन करता त्यात केवळ राजकीय मूल्ये ढवळलेली दिसतात. राजकीय प्रदूषण नष्ट करणे म्हणजे आकाशाला ठिगळ लावणे होय. नद्यांनी समुद्र शुद्ध करणे अशक्य. ही विनोबाची पावती आहे - पण हे सारे प्रदूषण सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक पातळीवर घडत नाही कां ? कवी अनिलांनी 'सारेच दीप कसे मंदावले' या कवितेत सखेद आशावाद चित्रित केला. आज दिवे विझण्याची वेळ आली आहे. त्यावर तुमचे चिंतनगर्भ बोट ठेवलेले दिसत नाही. एक शिक्षक, प्रतिभावंत, प्रज्ञावंत व आपल्या वाणीने सारे साम्राज्य जिंकणारा, त्याच्या चौफेर नजरेत हा प्रदेश उजळून गेला पाहिजे. या मर्यादेसह तुमच्या शीर्षकावर आम्हा वाचकांना नव्याने उभे राहून विचार करावा लागतो. अशावेळी ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाचा उपसंहार आठवतो व त्यातल्या ठळक ओवीवर वाचकाची मदार जडते. ज्ञानेश्वर सिद्ध पुरुष होते, तर तुमच्या सारखे साधक मात्र वेगळ्या वाटेने माणूसपण जपतात. चिंतेकडून चिंतनाकडे वळतात. म्हणूनच 'अमृतानुभव' हा तुमच्या लेखी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आस्वादाचा विषय आहे. अनुभूतीचा प्रदेश आहे. त्यातला आनंद 'विश्वाचा सण' लुटणारा अलौकिक आनंद आहे.

''म्हणोनी माझी वैखरी / मौनातेही मौन करी
हे पाणियावरी मकरी / रेखिली जैसे''

(अमृतानुभव - १०/१७)

या ओवीचा भावार्थ सांगणारे शीर्षक तुम्ही आपल्या जीवन प्रवासास कां दिले असावे ? तुमची वरील खंत लक्षात घेता, जीवनप्रवासाचा उपसंहार मला तुमच्या 'पाणीयावरी मकरी' या शीर्षकात दिसतो. ज्ञानेश्वर हा तुमच्या 'प्रतीती विश्रांती'चा आसरा आहे. साहजिकच अमृतानुभव हा तुमच्या 'विश्वाचा सण' बनून गेला आहे. या क्रमात तुमच्या शीर्षकाचा उलगडा मला सापडतो, तो असा

ज्ञानेश्वरांसारखे सतत 'परा'वाणीचे भोक्ते असणारे विभूतीसंतही नम्रतेपोटी 'स्व'प्रकाशित आत्मवस्तूचा उल्लेख 'वैखरी' वाणीने करतात. शेवाळकर, तुम्ही तर स्वतः ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचे, स्वतंत्र प्रणालीचे भोक्ते आहात. केवळ स्वतःची साधकावस्थेची भूमिका घेऊन अमृतानुभवाचा स्वतःला भावलेला अर्थ घेऊन नम्रभाव म्हणून 'पाणियावरी मकरी' असे शीर्षक घेऊन आपल्या जीवनाची वळणे तुम्ही गिरवली आहेत. तुमची सगे-सोयऱ्यांची मांदियाळी पाहता यात कुणाला ढोंग दिसेल. माझ्यासारखे मैत्र जपणारे वेगळ्या वाटेने जातील. जे जीवन तुमच्या वाट्याला आले त्याच्या एकूणच तृप्तीत तुमच्या मर्यादित अहंभावाचा त्याग केलेला दिसेल आणि पूर्णत्वाच्या जाणिवेने येणाऱ्या दर्पाने तुमच्या कृतार्थतेची भावना भरून पावली. तुमचे 'निरोप तीर्थावरील स्वैरचिंतन' जमेस धरूनही मी हे लिहित आहे. अशाही स्थितीत तुमची वैखरी 'मौनाचेही मौनकरी' पर्यंत मजल मारते यात मला जीवन सिंहावलोकनापेक्षा तुमच्या आतबाहेरच्या पूर्वसंचिताचाच भाग अधिक दिसतो. आजपर्यंत ज्या ज्या उपक्रमाच्या मांदियाळीत तुम्ही आपल्या जीवनाशी तादात्म्य झालात, ते सुद्धा तुमच्या वैखरीपेक्षा अधिक शब्दातीत म्हणूनच मौनाकडे झुकले आहे. हे सारे लिहून पुन्हा जो वाणीचा विलास आम्हा वाचकांना दिला, ते सारे पाण्यावर मकरीचे चित्र काढावे, तसे विनम्र झाले आहे. तुम्ही चित्र तर रेखाटले पण ते रेखाटले असूनही न रेखाटल्यासारखे आहे. अमृतानुभवात ज्ञानेश्वर आत्मसंवाद दाखवून देतात. तुम्ही जी खंत व्यक्त केली त्यातला आत्मसंवाद लोकसंवादाची वळसे घेऊन नवतीकडे डोकावताना दिसतो. या कबुलीवजा खंतेतही तुमचे बोलणे संपत नाही किंबहुना अभिव्यक्ती हे तुमचे सामर्थ्य आणि खंतेतही तुमचे बोलणे संपत नाही किंबहुना अभिव्यक्ती हे तुमचे सामर्थ्य आणि मर्यादा दोन्ही झाले आहे. तुम्ही जी चार परिशिष्टे शेवटी दिली आहेत त्यात फुशारकी नसून सात्विकतेची पुष्टी 'सांगणे' होऊन येते. आपल्या जीवनाच्या प्रवासात विविध वळणावर जो आनंद तुम्ही भोगला तो तुमच्या लेखी 'विश्वाचा सण' म्हणून साजरा करावा, हा आनंद साऱ्या विश्वाने आपलासा करावा (इथे मला विश्वाचा आकार केवढा / ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा - या केशवसुतवचनाची आठवण होते.) हीच तुमची तहान आहे. भूक आहे. ज्ञानेश्वर आणि तुम्ही स्वतः मातृसुखाला मुकल्यामुळेच की काय वात्सल्याच्या डोहात डुंबत 'माऊली' बनून गेला आहात. वृद्ध मायाळु माणसाकडे पाणावलेल्या डोळ्यांनी तुम्ही पाहात आहातच. तुमच्या साऱ्या माणसाळलेल्या मर्यादा लक्षात घेऊनही तुम्ही 'धन्यो गृहस्थाश्रमा'मध्ये स्वतःच्या पत्नीविषयीचे वेगळे तादात्म्य दिसते. एरवी सौ. विजयाबाईंच्या लेखी 'आहे मनोहरपरी' सांगताना कुठेतरी 'गमते उदास'चा आत्मप्रत्यय येण्यासारखा तुमच्या नवरेशाहीचा प्रताप दिसतोच ना.

तुमचे हे सारे जीवनप्रवासातले विवेचन अधिकसे रिपोर्टाईज झाले असले तरी ते रुक्ष नाही. उलट तो एक मुक्त असा आविष्कार आहे मग त्या आविष्कारात जे विषय आले ते आले, त्यांचा क्रम जसा राहिला तसा राहिला. सारेच कसे सहजपणाने होत गेले आहे. या सहजपणातही त्याचे म्हणून अकृत्रिम सौंदर्य साठलेले आहे. जे जीवन तुमच्या वाट्याला आले त्यात काव्य हा तुमचा ध्रुवतारा होता आणि तो तुम्ही रेघोट्या ओढीत असोशीवृत्तीने भोगला. त्यातला उपकारापुरता उरलेला भाग अंगाऱ्याने संपन्न झाला. या काव्यातल्या रेघा 'पाणीयावरी मकरी' होऊन तुम्हाला कवितेतून बोलावतात. तुमची खंत बाजूला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सारतात. आपल्या या जीवनाच्या वळणातील सूक्ष्म असे मानसिक अनुभवातील सौंदर्य टिपण्याचे तुमचे चातुर्य वाचकाच्या मनाला मोहून टाकते. तुमचा आवडता कवी कालिदासाने तर ही किमया केली नाही ना ? कारण मी जसा तुम्हाला अनुभवतो तसा हा सौंदर्याचा ओघ अविरतपणे तुमच्या सान्निध्यात मला जाणवतो. जीवनाच्या संध्यासमयी सुद्धा हा ओघ दुपदरी होऊन एकाच गतीने म्हणजे अनासक्ती व सौंदर्य भावनेने जाताना दिसावा, एवढा अविभाज्य झाला आहे. यातूनच तुम्हाला अतीताच्या प्रदेशातील सौंदर्याची ओढ लागल्याची दिसते व आम्हाला समाधान मिळते. इथे कृतज्ञतेला कृतार्थतेची जोड मिळावी किंवा तृप्तीला अतृप्तीचा जीव सापडावा तसे झाले आहे. तुमच्या लेखी अनासक्ती आणि रसिकता या परस्परविरोधी नाहीतच किंबहुना अनासक्तीमुळे ज्याचे मन वासनेच्या पाशातून पूर्णपणे बाहेर पडते तेच मन सौंदर्याचा विशुद्ध आस्वाद घेऊ शकते. तुमच्या अमृतमहोत्सवी सत्कार प्रसंगी लतादिदींनी काढलेले उद्‌गार 'मोगरा फुलला' मला भावपूर्ण वळणाचे वाटतात. निरपेक्ष आनंद आणि सौंदर्याचा नितळ आस्वाद याच्या समेटावर आपल्या उभयतांची भेट अध्यात्म्याची झाली आहे. इथे मला अभिप्रेत असलेले अध्यात्म मनाच्या शुद्धीकरणाचे दिसते ते विश्वात्मक सत्य त्याच्या भावनात्मक आकलनाचे आहे. शेवाळकर, तुमची रसिकता सर्वस्पर्शी आहे. आपल्या प्रपंचातील घटना, निसर्गाची विविध रुपे, वाग्यज्ञाच्या आहुती हे सारे अनुभवताना व त्यानंतर पलीकडे जाताना तुम्ही सौंदर्यव्रती होता, नव्हे या सौंदर्याचे बादशहा बनता, हे इतरांना न दिसणारे सत्य आहे. तुमच्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा वाहता ओघ रसिकतेच्या वळणाने त्रिवेणी संगमात वाचकांना सुस्नात करतो.

आपल्या गतायुष्यातील प्रसंगावर काढलेली चित्रे पाहता वाचक ज्या ठिकाणी क्षणभर थांबतो आणि तुमच्या या रसाळ वाणीबरोबर तुमच्या रसिकतेला सलाम करतो. मला पुन्हा पुन्हा सांगावेसे वाटते की तुमचे व्यक्तिमत्व तुमच्या वाणीच्या द्वारा व्यक्त होणाऱ्यास अधिक खेचते - म्हणूनच त्याचे 'संध्याछाया सुखवती हृदया' हे पालुपद झाले आहे. तुम्ही सतत कवी प्रवृत्तीची क्षितिजे पाहण्यात, ती अजमावण्यात आनंद घेत आहात याचा आम्हाला केवढा दिलासा वाटतो. आपल्या वाट्याला येणारी सुखदुःखे, रागलोभ, हेवेदावे, आशानिराशा अशा अनुभवातून उद्‌भवणाऱ्या भावनांच्या कल्लोळातून जेव्हा तुमचे हे जीवनकथन ओघवते होते, तेव्हा आणि आपल्या शाश्वताचा शोध घेऊ पाहणारी चित्ताची समघातता शोधते, तेव्हा त्यातले सर्व उमाळे संपून जातात. त्यातल्या सर्व भोगांनीच वाचकांना समाप्त केल्याचा भावप्रत्यय आणून देतात. आयुष्यभर तुम्ही अभिजात वाङ्मयाशी सलगी केली. त्यातली उत्स्फूर्तता आणि सहजता मनोज्ञ झाली आहे. त्यामुळेच सारे जीवन विषयक चिंतन वाचून झाल्यानंतर एका उत्कट, अनिवर्चनीय आनंदात 'झपूर्झा' होऊन जाते. ज्या अनंताच्या प्रदेशाकडे रसिकतेने तुमचे डोळे लागले आहेत, त्याकडेच हे विवेचन ओढले जाते, आणि एका नव्या गहन गंभीर आशयाने ओतप्रोत भरलेल्या व सौंदर्ययुक्त रचनेने नटलेल्या अपूर्व ग्रंथाची तुमच्याकडून अपेक्षा करते. तुमच्या खंतेला तुम्हीच दिलेले हे उत्तर आहे.

■ ■ ■

पाणीयावरी मकरी
ले. राम शेवाळकर
साहित्य प्रसार केंद्र, नागपूर-१२
मूल्य ३७५ रुपये



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ मालविका ॥

डॉ. सुलभा हेर्लेकर

प्रा. विश्वास वसेकर यांचा हा काव्यसंग्रह म्हणजे एक प्रेमकवितांची मालिका आहे. या कविता वाचता वाचता मी सुरुवातीचे मनोगत वाचले आणि कवितेपेक्षाही ते अधिक सुंदर वाटले. त्यातील प्रेयसीबद्दलची कोमल भावना, तिची बुद्धिमत्ता आणि तिच्या असण्याचा डौल हे सारे कवितेमधून, स्वप्नामधून, चित्रपटाच्या सुरेल गाण्यामधून कवीने मांडले आणि सुरुवातीलाच रसिकांना आपल्या नाविन्यपूर्ण प्रेमात चिंब भिजवून टाकले. बोरकरांनी म्हटल्या प्रमाणे

अष्टादश फुलवित पुलकी प्रणय पुराणे ।
या आलीस माझ्या वयस्क आश्रमधामा ।

कवीच्या उशीराच्या वयात ही प्रेयसी आली आणि सुरेल कवितांचा गुच्छ देऊन गेली.

असं म्हणतात, वयाचाही एक गुच्छ असतो. प्रेम करण्याचा, कामं करण्याचा, खेळण्याचा हा गुच्छ. याचे झाड महाविद्यालयातील दिवसातच लावायचे असते. ते चांगले रुजले तर हे वयाचे झाड पुढे बहरून येते. ते न रुजले तर किरटेच राहते. आयुष्यभर कुरतडत राहते. पण विश्वास वसेकर यांनी प्रेमाचे झाडच नव्हे तर वटवृक्षच त्यांच्या तारुण्यात लावला आणि आज त्यांच्या प्रौढ वयातही तो बहरून आलाय. त्यांच्या या कविता म्हणजे प्रसन्नतेचा कल्लोळच आहे. प्रेमाला कुठे का वय असते ? प्रेमकवितांचा हा गुच्छ म्हणजे मोबाईल, कॉम्प्युटरच्या या युगातला निर्मळ वाहणाऱ्या प्रेम झऱ्याचा दस्तऐवजच आहे.

काव्याचा संसार हा मानवी जीवनाला व्यापून असतो. माणसाच्या पृथ्वीवरील जीवनामध्ये अभिजात प्रेम ही अशी एक शक्ती आहे की जिला मरण नाही. ती चिरंजीव आहे. या शक्तीचा परमोच्च अविष्कार कवी कवितेत जास्त करतो. मानवाची संस्कृती या युगातून दुसऱ्या युगात जाते. कारण कवी हा द्रष्टा असतो. अशा काहीशा वेगळ्या आणि मनाला आनंद देतील अशा शब्दांच्या या कवीच्या कविता रसिकांना आनंद देतात.

विश्वास वसेकरांच्या इतरही संग्रहातील कवितांचा अविष्कार किंवा स्थायीभाव हा प्रेमच आहे, असे नव्हे. पण प्रेम त्यांच्या अणुरेणुत मुरलेले आहे. त्यांच्या स्वप्नातील प्रेयसी इथे अवतरली आहे आणि या कविता वाचताना त्याचा सुखद प्रत्यय येतो.

'तुझ्या खळखळून हसण्यात
कुंदकळ्या कालवल्या हृदयात
मी विस्मय चकित
खेळण्याचे दुकान उघडल्यानंतरच्या मुलासारखा
तटस्थ इच्छुक, उत्सुक....'

किंवा

'काय करावं
प्रेम वाटावं का न वाटावं
पहिल्याच भेटीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवडलेल्या एखाद्या माणसाकडे
न्याहाळ न्याहाळ पाहावं
का नं पाहावं ?'

अशा काही ओळीतून ते कळतही जातं. ग्रेसच्या कवितेतून, मेघना पेठेच्या कथांतून आपल्या कवितांना ते प्रेमाचा रंग देतात.

'ग्रेस आवडतो म्हणतेस ना
तर मग 'प्राणांवर नभ धरणारा'
आणखी
'दिक्कझल धुक्याच्या काळात
हृदयाला स्पंदविणारा'
एखादा सख्खा मित्र नको का ?
संदर्भासाठी मेघना पेठे तरी वाच'

एकूणच आधुनिक युगातल्या प्रतिक-प्रतिमांचा वापर कवी करतो. वरील ओळीत तर आधुनिक स्त्रीवादी स्त्रीचे चित्र अप्रत्यक्षपणे वसेकर चित्रीत करतात.

एक मात्र आहे. त्यांची सहजता मनाला भावते. ते क्लृप्त्या करीत नाहीत. **'तू जवळ असतेस, तो कर्मयोग; दूर जातेस तो भक्तीयोग'** हे मार्मिक, डोळस, निरीक्षण मनाला विचार करायला लावते. 'मालविका' ही कविता तर अनेकार्थी आहे. देहाने एका ठिकाणी मनाने दुसरीकडे, प्रेम युद्धनीतीत असेच असते. धारिणी स्वीकारतेच मालविकेला आणि कालीदासाची सतर्क प्रतिमा योजून दोन सवतीचे मीलन दाखविले आहे. कवितेतील जगाला पूर्णता प्रदान करण्याचे कार्य अवकाशाच्या पातळीवरून जसे होते, तसेच ते काळाच्या पातळीवरही होते. कितीही छोटी असली तरी कविताही ही एक घटना किंवा घटनाक्रम असते. ती अर्थातच काळाच्या पातळीवर उलगडत असते. कवितेतील घटनाक्रमाची लय ही कवितेची आंतरिक लय असते. या विशिष्ट घटना ज्यामध्ये आकाराला येतात तो काळ नायकांच्या जगण्याचा एक भाग असतो. मात्र काळाला असलेली लय ही त्या जगण्याला सौंदर्यात्मक करण्यासाठी कवीने दिलेली देणगी असते. काळाच्या पातळीवर प्रवास करताना या कवितेच्या नायकाच्या मनातील व्याकुळता, त्याचे धैर्य, मालविकेकडे बघण्याचा दृष्टिकोण या सर्व गोष्टी त्यांच्या भोवतालच्या जगातील 'ती' विषयीच्या भावनात्मक मूल्यात्मक दृष्टिकोण व्यक्त करतात. एक सौंदर्यात्मक मूल्य आणि भोवतालच्या जगाशी असलेले ज्ञानात्मक नैतिक मूल्य अशा दृष्टिकोणातून नायकांची ही कथा कहाणी प्रवासी होते आणि कवीला जे सांगायचे त्याची पूर्तता होते.

विश्वास वसेकर जेव्हा अशा कविता लिहितात तेव्हा या विश्वाचं रहस्य शोधण्याची त्यांची विलक्षण आर्त ओढ कळून येते. प्रेमातल्या, मैत्रीतल्या, विरहातल्या कविता या दृष्टीने बघण्यासारख्या आहेत. उदा. वीज, एकांत, नीलकमळ, अघोरी प्रयोग, धुक्याच्या अंगणात, मानसानं, निमंत्रण, मोर नाच, योग, कॅथेरीन इत्यादी किती तरी. वसेकरांची कविता निश्चितच खोल खोल प्रवास करणारी आहे. तिच्यात उपरी प्रयोगशीलता म्हणूनच ती नवीन आहे. जिथे असा प्रयत्न झाला तिथे कविता फसलीय. पण अशा जागा थोड्या आहेत. प्रतिमा प्रतिकांत मात्र कवी नाविन्यपूर्ण योजना करतो. उदा. मेघना पेठेचं



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उदाहरण 'तक्रार' या कवितेत 'झाडाला लागावी सविकल्प समाधी, अपघाती बीज, नवस म्हणून वर्ज्य केलेला भात, कनुप्रियांची गाठ, ग्रेस शब्दाचं व्याकरण, लक्ष्मणच्या चित्रात जसा कॉमन मॅन, त्यानं माझा वाटा जंबुकासारखा, केवढा महान अपरिग्रह, पोह्यांच्या लयीला छेद देणारे उद्धट शेंगदाणे, पिता पिता तोंडली कधी खाऊन झाली' इत्यादी प्रयोग-प्रतिमांनी कविता अविष्कृत झाल्या आहेत. स्वयंपाकघरातील खाण्याच्या वस्तूंचा असर अधिक असला तरी तो नाविन्यपूर्ण आहे. इतकेच नव्हे तर मांडणीतही

'काही ओलांडल्यासारखे वाटणारे टप्पे
काही जमल्यासारखं वाटणारं गणित
काही निभल्यासारखी वाटणारे प्रसंग
काही सुटल्यासारखे वाटणारे प्रश्न'

किंवा

'दशकापूर्वी विदेशी गेलेला मालक
आपल्या हवेतील परतावा
तसं आगमन'

अशा मनमोहक ओळी लक्ष वेधून घेतात.

इथे भाषा आहे, शब्द आहे, प्रयोग आहे, नवीनता आहे आणि उत्कटता आहे.

'नीलकमल सारखी तुझी पावलं डावलून यायची रात्रीला ते दिवस किती न्याहाळ असत' असे प्रेयसीला सांगताना साऱ्या जगाची कडू चव झटकून प्रेम करणारा प्रियकर आहे. कवीच्या मनात जेवढ्या प्रेमाच्या कल्पना होत्या त्या सर्व साकार करण्यात कवीला यश आले आहे. आधुनिक परिभाषेच्या आधारे प्रेमाला भिडण्याचा एक अनोखा प्रयत्न इथे कवीने केला आहे.

विश्वास वसेकरांची कविता ही शारीर आणि भौतिक वासनांचं एकाच पातळीवर उदात्तीकरण साधते. देहमनाचे एक कम्युनिकेशन इथे दिसते. त्यामुळे परंपरेतून आलेल्या भव्य प्रतिमा व प्रतिकांचा देहाच्या भव्यतेशी बांधिलकी ठेवत माणूसपणाची चिरंतन मूल्य टिपणारी ही कविता आहे. आत्मभानातून आलेली ही एक सशक्त आशयाची कविता आहे. अनुभवांची पारदर्शकता आणि सौंदर्यपूर्ण प्रेमशिल्प यातून निर्माण झालेली ही कविता व्यक्त करण्याचे कसब विलक्षण वाखाणण्यासारखे आहे

■■■

मालविका
विश्वास वसेकर
स्नेहवर्धन पब्लिशींग हाऊस, पुणे-३०
पृष्ठे १०८; मूल्य १०० रुपये

वर्गणीदारांसाठी सूचना

१. 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
२. 'युगवाणी' हे त्रैमासिक स्वरूपात निघणार असून एका वर्षातील चार अंकांची वर्गणी १०० रु. आहे.
३. वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाचा) स्वीकारण्यात येईल.
४. सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
५. वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
६. वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.
७. मनीऑर्डर फॉर्मवर 'संदेशासाठी असलेल्या रिकाम्या जागेत' वर्गणीदारांनी स्वतःचे नाव व पूर्ण पत्ता लिहिणे अतिशय जरूरी आहे.

पत्ता १. 'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४००५
२. विदर्भ साहित्य संघ, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४००१२.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ नवे प्रश्न नवी आव्हाने ॥

डॉ. मधुसूदन चान्सरकर

मराठी साहित्यापुढे आता नवी आव्हाने उभी आहेत. कारण पुढील २५ वर्षांत आपल्या जीवनाची व्याप्ती खूप बदलणार आणि वाढणार आहे. त्याची नेटेपणाने ओळख करून साहित्यिकांना पुढील दिशा दाखवावी लागेल. पुढचे पाऊल टाकतांना नवा प्रवाह, नवी गती, नवी यात्रा, यांचा मागील गोष्टींशी जो आंतरिक संबंध आहे तो लक्षात घेऊन साहित्याला वाटचाल करावी लागेल.

मागील शतकात ज्ञानाचा जो प्रचंड स्फोट झाला त्याचे पडसाद मराठी साहित्यात अजून पूर्णपणे उमटलेले दिसत नाहीत. आज जग छोटे झाले आहे. विभिन्न संस्कृती एकमेकांच्या दाराशी आल्या आहेत. संवादाची साधने वाढल्यामुळे इंटरनेट, ई-मेल, टेलिफोन, टी.व्ही. इ. साधनांमुळे अभिव्यक्तीचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. संगणकांच्या वाढत्या व्यापामुळे माहितीचे तंत्रज्ञान दिवसेंदिवस अधिक विकसित होत आहे. या सर्वांचा परिणाम मराठी साहित्यावर होणे अपरिहार्य आहे. तसेच वैज्ञानिक प्रगतीचाही आवेग प्रचंड आहे. क्लोनिंगसारख्या विषयांचा अजून मराठी साहित्यात चंचूप्रवेश झालेला दिसत नाही. आपल्या भोवताली हे सर्व परिवर्तन अगदी अनपेक्षित रीतीने घडत असताना मराठी साहित्य मात्र वस्तु-विपर्यासात्मक स्वप्नरंजनातच गुंतून पडले आहे की काय ? आजकाल मराठी साहित्यातून होणारे जगाचे दर्शन हे अवास्तविक वस्तूशून्य, विकल्पन आहे की काय, असे वाटू लागते. अजूनही मराठी साहित्य हे एकतर स्मृती-संस्कारजन्य किंवा भविष्यविषयक स्वप्नरंजनाचे अंग बनले आहे काय अशी शंका यायला जागा आहे.

आज जग प्रचंड वादळांनी वेढले गेले आहे. पहिले वादळ - सैनिकीकरण आणि युद्धजन्य आहे. त्यामुळे आजची जीवनशैली संघर्षमय झाली आहे. दुसऱ्या सांस्कृतिक वादळामुळे मानवी मूल्यांवर धाड आलेली आहे. तिसरे वादळ आपल्या बरोबर गरिबीचा भस्मासूर घेऊन आले आहे. विकासाचा वेग जसा वाढत आहे, त्याचप्रमाणे बेकारीचा राक्षस तरुणांवर घाला घालत आहे. या वादळांतून क्रांतीची वावटळ उठेल की काय अशी भीती वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे. चौथे वादळ मात्र महाभयंकर आहे. त्यामुळे आपल्या वसुंधरेचा ऱ्हास होत आहे. या चारही वादळांना तोंड देणारे सशक्त साहित्य मराठी भाषेमध्ये पुरेसे उपलब्ध नाही. ठिकठिकाणच्या साहित्य मंडळांनी व मराठी साहित्य महामंडळांनी याची दखल घेऊन नव्या आव्हानांना तोंड देण्याची क्षमता आता मराठी साहित्यात कशी निर्माण होईल याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

वर्तमानजगात स्वातंत्र्याची एक मोठी लाट उसळली आहे. वाक्-स्वातंत्र्य, आत्माविष्कार-स्वातंत्र्य, संघटन-स्वातंत्र्य, व्यक्तिगत-स्वातंत्र्य, इ. स्वातंत्र्य प्रकारांच्या नावावर शब्दांचा विविध व परस्परविरुद्ध अमाप दुरूपयोग चालू आहे. त्यामुळे जातीजातीत संघर्षाचे वणवे पेटवण्याचे कार्य सुरू झाले आहे. त्यामुळे मराठी मन आज जेवढे दूषित झाले आहे तेवढे ते पूर्वी कधीच झाले नव्हते. त्यामुळे साहित्यात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दलित साहित्य, बहुजन साहित्य, दीड टक्क्यांचे ब्राह्मणी साहित्य असे भेद निर्माण झाले आहेत. त्यामुळे आजचे कलासाहित्य जीवन बरेचसे पापविद्ध झाले आहे. शब्दशक्ती ही सदैव अपापविद्धच असली पाहिजे. म्हणून शब्दतत्वाला आणि वाक्यज्ञाला एका अनुशासनात बद्ध केले पाहिजे. अशी विधायक शिस्त, एकात्मतेची ओढ, मराठी साहित्यात सध्या का दिसून येत नाही ? परंतु अनेक साहित्यिकांना, डोळस असूनही मराठीची ही दुर्दशा दिसत नसावी. कारण, शब्द म्हणजे वस्तू नव्हे हे सत्य अजून त्यांच्या पचनी पडलेले दिसत नाही. भाकर हा शब्द म्हणजे भाकर नव्हे. डोळे, कान, स्पर्श, वास, यांनी भाकर दिसते, तिचा स्पर्श आणि गंधही समजतो. पण भाकर पोटात गेल्याशिवाय भूक शमत नाही. आज साहित्याला शब्दरूपाच्या पलीकडील मानवी मनाच्या भुकेची ओढ असायला पाहिजे. ती ओढ काही आधुनिक कवितांमध्ये दिसत असली तरी इतरत्र क्वचितच आढळून येते. त्यासाठी शब्दानुशासनाची गरज आहे. शब्दानुशासनातून चित्तानुशासन येईल. मग साहित्यात खरे वस्तुदर्शन होऊ शकेल. एकदा हा वस्तुदर्शनाचा प्रचंड अनावर आवेग सुरू झाला की मग त्यातूनच आत्मदर्शन आणि विश्वदर्शन संभवनीय होऊ शकेल, हा वैश्विक आयाम मराठी साहित्याला आता प्राप्त झाला पाहिजे.

आजकाल साहित्याची सामाजिक बांधिलकी सांस्कृतिक उत्थान, समाज प्रबोधन इत्यादींची प्रशंसा करण्याची फॅशन झाली आहे. हे सर्व जरी खरे असले तरी साहित्याच्या काव्य, नाट्य आदि प्रकारातून आनंदाची पेरणी करणेही तेवढेच महत्वाचे आहे. कारण निखळ आनंद हाच खरा साहित्याचा उद्देश असतो. त्यासाठी साहित्यात दोन प्रकारची भाषा वापरली जाते. एक असते साधीसुधी, वस्तुनिष्ठ, तर्कनिष्ठ भाषा. घटना, तारखा, वंशावली देऊन इतिहासाचे ज्ञान करून देणारी ! दुसरी भाषा इतिहासाला, मृताला, संजीवन देऊन जिवंत करणारी साहित्याची काव्यमय भाषा. इतिहास हा 'काल'च्या सावलीत विसावलेला निस्तब्ध हुंकार असतो. परंतु निर्मळ साहित्य हे एखाद्या गवाक्षाप्रमाणे असते. त्याला खिडकीची चौकट असते. बाहेरचे चांदणे, निसर्ग, निळे आकाश एखाद्या फ्रेममध्ये मर्यादित दिसावे तसे भासते. म्हणून फुलांच्या ताटव्यांवरून सहज फिरावे, त्यावेळी एकाही फुलाला स्पर्श न करता घरी परतल्यावरही सुगंधाचा अनुभव घ्यावा असे आनंददायी साहित्य निर्माण करणे हे महत्वाचे आहे. असा साहित्यिक हा खरा जादूगार असतो. असे जादूगार आजकाल कमी दिसतात. साहित्य म्हणजे नामरूप बदलण्याची यांत्रिक क्रिया झाल्यासारखे वाटते. खरे तर प्राकृतिक, प्रसवरूप, सर्ग एकीकडे असतो तर साहित्यिकाच्या प्रतिभा-प्रज्ञेतून उदयास आलेला 'प्रतिप्रसवरूप सर्ग' दुसरीकडे असतो. यातूनच शब्द साहित्यरूपाने बाहेर पडतात. शब्द, अर्थ आणि अक्षर ह्यांच्या सुसंवादाद्वारेच वाङ्मयीन क्रियेला सार्थता प्राप्त होत असते. तेव्हाच साहित्य हे ज्ञान व कर्म यांच्यात अनुबंध साधणारा हेतू बनते. ज्ञान म्हणजे दर्शन व कर्म म्हणजे वर्तन होय. दर्शन व वर्तन यांच्यात सुसंवाद साधणे ही साहित्याची अमूर्त कला आहे. जगणे व जाणणे या दोन पंखांवर आरूढ होऊन मानवाने आजवर प्रगती केली आहे. साहित्याशिवाय जाणणे अशक्य आहे. तसेच निर्मळ साहित्याशिवाय जगणेही अशक्य आहे. या दोन्ही गोष्टींना प्रेरणा देण्याचे कार्य साहित्य करीत असते. ही प्रेरणा अर्थ आणि शब्द यांच्यातील विसंवादाने विद्ध होते. तेव्हा साहित्यात एक अनर्थकारी परंपरा प्रवर्तित होते. मराठी साहित्यात अशी परंपरा निर्माण होणे - योग्य नव्हे. अंतर्यामीच्या अद्भुत मानसरोवरातून उगम पावणाऱ्या शब्दसरिता गंगाजलाप्रमाणे पवित्र असल्या पाहिजेत. ही गोष्ट आजकाल दुर्मिळ होत चालली आहे.

मराठी साहित्य ही सर्व आव्हाने पेलण्यास समर्थ झाले पाहिजे. ती कुवत साहित्यिकांमध्ये येण्यासाठी आत्मबोधाचे भान असले पाहिजे. तसेच भोवतालच्या परिवर्तनशील जगाचे ज्ञानही त्यांना झाले पाहिजे. आपल्या कूपमंडुक वृत्तीला सोडून सभोवतालच्या क्षणोक्षणी बदलणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचे ज्ञान त्यांना असले पाहिजे. हे ज्ञान त्यांच्या लिखाणात प्रकर्षाने प्रतिबिंबित झाले पाहिजे. तरच मराठी साहित्याची आजची दशा बदलेल व त्याला नवी दिशा प्राप्त होईल.

■■■

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ जी. ए. कुळकर्णी यांची तीन पत्रे ॥

संकलक दिवाकर कृष्ण आचार्य

धारवाड, २.६.८३

स.न.वि.वि.

तुम्ही अगत्याने पाठवलेला शॅलॉटवरील आपला लेख सोबतच्या पत्रासह मिळाला. त्याबद्दल मी फार आभारी आहे. तुम्ही कथा फार काळजीपूर्वक वाचली आहे यात शंका नाही; तिच्यावर लिहिलेल्या लेखाचे वाचनही तितक्याच काळजीने करावे लागणार. (शिवाय कथा बरीच जुनी असल्यामुळे खुद्द मलाच ती पुन्हा वाचावी लागणार !) हे सारे करायला थोडा वेळ लागेल, कारण सतत त्रस्त करणाऱ्या पोटाच्या विकारामुळे प्रकृतीला सांभाळतच हे करणे जरूर आहे. नंतर केव्हातरी मी सवडीने लिहीन अशी मला आशा आहे. तोपर्यंत पत्राबद्दल पुन्हा आभार. कळावे.

आपला

जी. ए. कुळकर्णी

ता. क. मागे एकदा एका प्राध्यापक समीक्षकाने शॅलॉटविषयी लिहितांना शॅलॉट म्हणजे कांदा असा अर्थ देऊन तिची आकृति शोधण्याचा प्रयत्न केला होता. (कोशात तसा एक अर्थ आहे.) पण त्याला Tennyson ची आठवण सुद्धा झाली हा विनोद मला आत्ता आठवला.

धारवाड, १३.११.८३

स.न.वि.वि.

दीपावलीनिमित्त तुम्ही अगत्याने पाठवलेल्या शुभेच्छा मिळाल्या. त्याबद्दल मी फार आभारी आहे. दीपावलीच्या पाऊलांनी आलेले वर्ष तुम्ही व तुमचा परिवार यांना भाग्याचे व यशाचे जावो.

शॅलॉटविषयी तुम्ही त्याविषयीचे विधान फार seriously घेतलेले आहे. कळावे. आता शॅलॉट म्हणताच ज्याचा इंग्रजी वाङ्मयाशी किंचित्‌ही संबंध आहे, त्याला आठवण येईल ती Tennyson च्या कवितेच्या Frame work ची. या टीकाकार महाशयांनी डिक्शनरी उघडली, व त्यातील त्या शब्दाचा 'कांदा' असा अर्थ शोधून काढला, व त्या आधारे ती कथा समजावून घेण्याचा प्रयत्न केला ! कांद्याच्या मदतीने पोहे समजतात, कथा नाही. त्याप्रमाणे स्वामीचा देखील कुठल्याही राजकीय विचार पद्धतीशी संबंध नाही.

माझी पुस्तके Out of print आहेत हे खरे. स्वत: माझ्याजवळ काजळमाया व पिंगळावेळ याखेरीज माझी पुस्तके नाहीत. पण यात प्रकाशकांचा दोष नाही. मलाच पुस्तकांच्या आवृत्ती नको होत्या. आता त्या पुस्तकांचे सारेच हक्क प्रकाशकाकडे वळते झाले आहेत, व त्याबद्दलचा त्यांचा निर्णय सर्वस्वी त्यांचाच राहील.

गांव, रान, इत्यादि अनुवादित पुस्तके मुंबईचे प्रकाशक परचुरे यांच्याकडे (बहुधा) मिळतील. पण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गांव हे पुस्तक सोडल्यास इतर पुस्तके तुम्ही मुद्दाम विकत घ्यावी असे मला वाटत नाही. म्हणजे ती चांगली नाहीत असे नव्हे. तर ती मधून मधून मला उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मला मिळाल्यास ती मी जरूर पाठवीन.

मौज दीपावली अंक १९८३ आपण पाठवू नये. मला मौज प्रकाशनकडून तो अंक सौजन्य भेट म्हणून येतोच. पण बरेच अंक भेट म्हणून येत असल्याने त्यांचे वाचन मात्र फार काळापर्यंत लांबते.

माझ्या पोटदुखीच्या विकाराविषयीचा सारा विचार (आणि त्याबद्दलची Treatment!) मी सोडला आहे. आता ती सांभाळूनच जे करायचे ते केले पाहिजे हेच खरे.

कळावे.

आपला

जी. ए. कुळकर्णी

ता. क. :- तुमचे कार्ड आले, त्याला कमी पडले. पण त्यामुळे मला बरे वाटले. गेल्यावर्षी अनवधानाने दोन पत्रांच्या बाबतीत माझ्याकडून ही नजरचूक घडली होती. तेव्हा या बाबतीत आपल्याला सोबत आहे, हे पाहून हायसे वाटले. केवळ एक गंमत म्हणून मी या किरकोळ गोष्टीचा उल्लेख करीत आहे.

धारवाड, १५.५.८४

स.न.वि.वि.

तुम्ही पाठविलेली तीन पुस्तके मिळाली. परंतु माझी उणीव या पुस्तकाबाबत नव्हती. तुमच्याप्रमाणेच आणखी एका मित्रानी ती दोन-तीन महिन्यांपूर्वी पाठवली होती. माझ्याजवळ "गांव" हे अनुवादित पुस्तक आणि रक्तचंदन, हिरवे रावे व निळासांवळाची पहिली आवृत्ति ही पुस्तके नाहीत.

पण तुम्ही तसदी घेऊन ही पुस्तके पाठवलींत, या अगत्याबद्दल मी फार आभारी आहे. अलीकडील चांगला कागद, composing, इत्यादि बाबतचे वाढलेले दर पाहिले, की एक अरबी कहाणीची किंमत जास्त नाही. (शिवाय दीडदोन वर्षे रक्कम गुंतून रहाते ही गोष्ट देखील ध्यानात घेतली पाहिजे.)

पुस्तक उत्तम काढायचे तर Folio Editions निघतात त्याप्रमाणे निघावीत. तशा तऱ्हेने हे पुस्तक काढले असते, तर त्याची किंमत चारशे रुपये झाली असती. ते जर शक्य नाही, तर वैभवाचे किरकोळ प्रदर्शन करण्यात फारसा अर्थ नाही. केळीची शिक्रण खाऊन कसली चैन करायची ? मला ते पुस्तक सुबक निघाले आहे असे वाटते. असो. हा मतांचा प्रश्न आहे. कधीतरी तुमच्याजवळ कोणती (माझी) पुस्तके आहेत हे कळवावे. म्हणजे नसलेले एखादे पुस्तक मिळाल्यास (पुन्हा !) पाठवता येईल. कळावे.

आपला **जी.ए.**

■■■

[टीप अकोला येथील कथालेखक श्री. दिवाकर कृष्ण आचार्य यांना जी. एं. नी लिहिलेल्या पत्रांपैकी तीन पत्रे]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ पाच भारतीय इंग्रजी कविता ॥ कवी आदित्य शंकर ॥

▯ [अनुवाद : किरण येले]

१. मी खातो माझे जग दररोज

मी खातो माझे जग दररोज
बुडवतो माझ्या आतलं गाव
सॉसच्या बाटलीत
लपवतो पावाच्या आत
'स्व' हरवल्याची लाज
अंड्यात उकडतो
आतली तरल सहजता

आणि
मी खात राहतो दररोज
मला होत असलेल्या
अपचनाच्या
कोणत्याही खुणा
चेहऱ्यावर न दाखवता.



२. एक पक्षी ओळखतो एका कवीला

शेकडो पक्षी
आहेत या शहरात
दुर्लक्षित
मी
ओळखतो त्यातल्या एकाला
जो झेपावतो आकाशात
या कागदांतून
नेहमी.

शेकडो कवी
आहेत या शहरात
पक्षी
ओळखतो त्यातल्या एकाला
जो देतो त्याला आकाश
झेप घेण्यासाठी
नेहमी.

३. एक शहर

झाडे
वारा
उडणारे पक्षी
तृणपात्यावरले दवबिंदू
भविष्याचा रक्तरंग
भूतकाळाचा कृष्णरंग
लोकांनी गायलेली गीते
सगळं उडून गेलंय
या चित्रातनं.
साहजिकच
या जागेला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बरे केले; कारण त्यांची भूमिका समाजशास्त्रज्ञाची आहे. लेखाच्या प्रारंभीच, ओबडधोबडपणे, त्यांनी म्हटले आहे, "प्रस्तुत लेखात समाजशास्त्राची अभ्यासक आणि त्यांच्या लिखाणाची नियमित वाचक म्हणून गौरी देशपांडेंच्या लिखाणाचे विश्लेषण केल्याने जे सापडले, ते मांडले आहे." (पृ. १९)

मराठीतील स्त्रीवादी, विद्रोही, जननिष्ठ साहित्याचे असे विश्लेषण जितके होईल तितके ते, सर्व दृष्टीने, हितकारक ठरणार आहे.

गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील आशयासंबंधीची श्रुती तांबे यांची ही काही निरीक्षणे

१. "१९८० च्या दशकात भारतातील अनेक उच्चवर्गीय उच्चवर्णीय शहरी तरुण ग्रामीण भारताच्या पुनर्निर्माणासाठी सर्वस्व झुगारून विधि लढे, आंदोलनात उतरले होते. गौरी देशपांडेंची पात्रे याच कालखंडात जगणारी आहेत; परंतु त्यांच्या चर्चा-संवादात याचे उल्लेख कुठेच नाहीत." (पृ. २५)

२. "दिमित्री आणि इतरांबरोबर कोणत्यातरी देशात सहलीला गेल्यावर बुद्धाची मूर्ती दिसते आणि कालिंदी त्याचा अर्थ इतरांना सांगते, असा उल्लेख आहे; पण तो अर्थ ती काय आणि कसा लावते, हे लिखिका नेमके गुलदस्त्यात ठेवते !" (पृ. २६)

३. "बंडखोर लिखाण करणाऱ्या गौरी देशपांडेंच्या नायिका सखोल वाचनानंतर मात्र पोरक्या... मोडलेल्या दिसतात....मग ते बंडखोरपण आहे कुठे ?" (पृ. २६-२७)

श्रुती तांबे यांनी आपल्या या लेखात अनेक मार्मिक समाजशास्त्रीय निरीक्षणे नोंदली आहेत; परंतु शिथिल वाक्यरचना, विस्कळीत विचारप्रवाह यामुळे त्यांचे प्रमेय एका वाचनात वाचकाच्या मनात बिंबत नाही; ते प्रमेय असे गौरी देशपांडे यांच्या नायिका समकालीन वास्तवाची पुरेशी दखल घेत नाहीत; त्या खऱ्या अर्थाने बंडखोर नाहीत; त्यांच्यावर भांडवली व्यक्तिवादाचा प्रभाव आहे, इत्यादी. बेढब शैलीतील प्रस्तुत लेख पुनःपुन्हा वाचल्यावर समजतो; व समजल्यामुळे त्याचे महत्त्व पटून मग तो पुन्हा एकदा वाचावासा वाटतो !

लेखिकेची समाजशास्त्रीय निरीक्षणे कॅज्युअल वाचकास पटत असली तरी त्या निरीक्षणांचे मूल्यमापन समाजशास्त्राचे अभ्यासकच करू शकतील - त्यांनी ते करावे; मात्र प्रासादिक शैलीत !

'प्रतीतिभेद' या लेखसंग्रहात (आकांक्षा प्रकाशन, नागपूर, द. भि. कुळकर्णी, २००७) लेखकाने 'गौरी देशपांडे' या लेखात गौरी यांच्या लेखनासंबंधी आपली वाङ्मयीन निरीक्षणे नोंदली आहेत; त्यापैकी काही निरीक्षणे अशी

१. "फडके-खांडेकर यांच्या कथा कागदापुरत्याच होत्या - त्यामुळे त्या वाचकास निर्मितीप्रक्रियेत सहभागी करीत नव्हत्या; वाचक वाचनसमयी निष्क्रिय राहिल्यामुळे त्याच्या मनाला सुखकारक विश्रांती मिळत असे." (पृ. ३४)

२. "फडक्यांच्या एकूणच साहित्यात शैलीची जी ऐट, व्यक्ती आणि प्रसंग यांची जी रेखीव तरीही तपशीलवार बाह्यचित्रे आणि जे स्थलवैचित्र्य दिसते त्यांची रेलचेल गौरी देशपांडे यांच्या लेखनात आहे." (पृ. ३४)

३. "गौरी देशपांडे यांच्या लघुकथा व दीर्घकथा वाचताना इंग्रजी वाचकांचे मनोरंजन करण्यासाठी निर्माण होणाऱ्या इंडो-अँग्लियन साहित्याचे स्मरण होते...." (पृ. ३७)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गौरी देशपांडे यांच्या लेखनास एकाने कलामूल्ये लावली, दुसरीने समाजमूल्ये लावली, तरीही दोघांचे निष्कर्ष अंतिमतः सारखेच निघाले, याचे कारण काय ? या प्रश्नाचे उत्तर द्यायला मराठीत आता 'दुसरे मर्ढेकर' किंवा 'दुसरी कुसुमावती' जन्मावा लागेल.

- डॉ. द. भि. कुळकर्णी

पुणे



३७३५६
13.3.98

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ
।। कार्यवृत्त ।।
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २००७

ऑक्टोबर, २००७

❑ **९ ऑक्टोबर** : साने गुरुजी यांनी स्थापन केलेल्या 'साधना' या मराठीतील पत्रकारिता करणाऱ्या साप्ताहिकाच्या हीरकमहोत्सवानिमित्त 'निवडक साधना' या साधनेतील निवडक लेखांच्या आठ खंडातील ग्रंथाचे प्रकाशन व 'ध्येयवादी पत्रकारिता' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

नोव्हेंबर, २००७

❑ **१ नोव्हेंबर** विदर्भ साहित्य संघातर्फे नरखेड येथे होणाऱ्या ५६ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक नामदेव कांबळे यांचा सत्कार ज्येष्ठ लेखिका व कादंबरीकार आशा बगे यांच्या हस्ते करण्यात आला.

❑ **६ नोव्हेंबर** विदर्भ साहित्य संघ व ऋचा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. माणिक वड्याळकर यांच्या 'उषःकाल', 'वेड्या मुलींची गोष्ट', 'मल्लिका मधुकर कुळकर्णी' या तीन एकांकीकांचे प्रकाशन अध्यक्ष आयुर्वेदाचार्य डॉ. रामकृष्ण पुजारी ह्यांच्या हस्ते विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात झाले.

डिसेंबर, २००७

❑ **३ डिसेंबर** : प्रा. केशव मेश्राम यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.

❑ **११ डिसेंबर** : मराठी साहित्यातील ज्येष्ठ समीक्षक कै. म. वा. धोंड व इतिहासकार पु. ना. ओक यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

❑ **१९ डिसेंबर** विदर्भ साहित्य संघ आणि सप्तक तर्फे सुप्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकर आणि कविवर्य ग्रेस यांच्या शब्द व स्वर यांच्या मैफलीचा 'घनकंप मयुरा' हा कार्यक्रम वसंतराव देशपांडे सभागृहात झाला.

शाखावृत्त -

भंडारा

२४ ऑक्टोबर, ०७ पु. भा. भावे स्मृतिदिनानिमित्त प्रसिद्ध अभ्यासक श्री. हर्षल मेश्राम यांचे 'पु. भा. भावे एक आकलन' या विषयावर व्याख्यान झाले.

लाखनी

२५ नोव्हेंबर, ०७ प्रा. द. सा. बोरकर लिखित 'विरही' या ग्रंथाचे प्रकाशन वामनराव तेलंग यांच्या हस्ते झाले.

मोर्शी

२८ नोव्हेंबर, ०७ : प्रबोधन विद्यालय दर्यापूर येथील डॉ. सतीश तराळ यांचे 'महात्मा फुले यांचे साहित्य' या विषयावर व्याख्यान झाले.

चंद्रपूर

ऑक्टोबर, ०७ माजी राज्यमंत्री श्रीमती यशोधराबाई बजाज यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारलेल्या सौ. शुभांगी भडभडे लिखित 'आकाशवेध' या आत्मचरित्रात्मक कादंबरीचे प्रकाशन झाले.

■■■

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ